छात्र

प्रबोधन

वर्ष ३, अंक १० सौर वैशाख, शके १९१७



ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे अभिनव मासिक !

सायकल सहल

वृत्त पान २९ पर





ॐ

छात्र प्रबोधन

वर्ष ३, अंक १०
सौर वैशाख, शके १९१७

इवली शल्ये रुपती खुपती, मात करु दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी, ने ज्योतिर्जगतात।

संपादक, प्रकाशक
महेन्द्र सेठिया

संपादक मंडळ
महेन्द्र सेठिया B. E. M. Ed.
विवेक पोंक्षे M. SC. B. Ed.
अनघा लवळेकर M. A. B. Ed.
शैलजा देशमुख M. A., B. Ed.

मुखपृष्ठ व आतील चित्रे
भास्कर सगर, पुणे

अक्षर जुळवणी
XLNC GRAFIKS
कर्वे रोड, पुणे.

संपर्क
'छात्र प्रबोधन'
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०
☎ ४७७६९१

मुद्रक
प्रबोध संपदा, पुणे - २

वार्षिक वर्गणी
रु. ७५/-

नोंदणी क्रमांक
PHM/153/VIII

या अंकात दडलंय काय ?

संवाद २
कथा--गुप्तधन भाग-३ ..... ३
बुध्दीच्या प्रांगणात- निर्णयक्षमता -भाग- ४ .. ९
विज्ञानाच्या चष्म्यातून - काचेवर प्रयोग १४
गिर्यारोहणगाथा-गिर्यारोहणाचे शिक्षण कोठे? १७
वेळ मिळाला तर खेळ २१
राबणारे बाल कामगार २३
असे हे गणित-- असे हे गणिती - सात पूल . २७
दमण्यातला आनंद-५००कि.मी.-सायकल सहल २९
हितगुज ३५
का व कसे ? ३८
वाचलेच पाहिजे असे काही - युद्धनेतृत्व ४१
तुम्हाला माहीत आहे का? ४४
कल्पक बनूया - कल्पनांचा ओघ ४५
मासिकाच्या वर्गणीसंबंधी ४७

संवाद

प्रिय प्रबोधक मित्र-मैत्रिणींनो

वासंतिक विशेषांकानंतर विविध प्रकारच्या शिबिरांमुळे हा अंक निघण्यास उशीर होत आहे. त्याबद्दल क्षमस्व! पण तुम्ही सर्वजण मासिकाची खूप आतूरतेने वाट पहाता हे पाहून आनंद झाला. कामातला उत्साह वाढला. यापुढील अंक वेळेत मिळतील याबाबत विश्वास बाळगावा.

येत्या ८-१० दिवसाच्या फरकाने पुढचे दोन अंक तुमच्या हातात पडतील. आपण म्हटल्याप्रमाणे वर्षभरात १२ अंक तुमच्यापर्यंत नक्कीच पोहोचतील. येत्या काही महिन्यात एक अंक आपण विनोद विशेषांक काढणार आहोत. वर्षभरातील विविध अंकांमध्ये थोडीशी दुर्लक्षित राहिलेली ही बाजू या विशेषांकातून भरून निघेल असा विश्वास वाटतो. तुम्हा सर्वांचेही योगदान यामध्ये हवे आहे.

एप्रिलमधील सायकल सहल फारच छान झाली. छायाचित्रे पाहून व वृत्तांत वाचून तुम्हालाही त्याची कल्पना येईलच. कष्टातही आनंद कसा लुटायचा, स्वत:च्या क्षमतांना ताण देत एखादी गोष्ट जिद्दीवर कशी पूर्ण करायची, स्वत: दमलेले असतानाही अडचणीच्या प्रसंगामध्ये एकमेकांना मदत करत गट म्हणून कसे एकत्र रहायचे आणि येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीशी स्वत:ला कसे जुळवून घ्यायचे,अडचणींना सामोरे कसे जायचे, हे सर्व या सहलीतून शिकायला, अनुभवायला मिळाले. खूपच धमाल आली. छात्र प्रबोधनच्या २१ सभासदांनी केलेली ही धडपड इतर अनेकांना स्फूर्ती देणारी होईल असा विश्वास वाटतो.

सुट्टी संपून शाळा सुरू झाली आहे. यावर्षीच्या सुट्टीत तुम्ही काय काय केले, कोणते अनुभव घेतले, कोणते विशेष काम केले, नवीन काय शिकलात, कोठे कोठे हिंडून आलात, याचा एकदा आढावा घ्यायला हवा आणि विशेष काही घडले नसेल, सुट्टी नुसतीच वाया गेली असेल तर निदान पुढच्या सुट्टीमध्ये तरी ठरवून काही विशेष करायला हवे. वेगवेगळ्या क्षेत्रातील विशेष व्यक्तींच्या मुलाखती घेऊन या, वाचन करा, काहीतरी वेगळा अनुभव घ्यायचा प्रयत्न करा अन् असे काही विशेष अनुभव आमच्यापर्यंत पोहोचवा.

नुकतीच महाराष्ट्रात ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात व जोरदार उपस्थितीनिशी व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे संपन्न झाली. छात्र प्रबोधन नुसते मासिक नाही. सभासदांनी मासिक वाचून थांबू नये. त्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन कृतिशील व्हायला हवे आहे. शाळेच्या प्रारंभी झालेल्या या शिबिरांमधून तुम्ही नक्कीच खूप काही मिळवले असेल. नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा!

सस्नेही तुमचा

(महेन्द्र सेठिया)

''पण ते यंत्रच सर्वात कठीण आहे. तरीसुद्धा त्याचं गूढ मी मनातल्या मनात उकललं म्हणून तर 'सापडलं' असं ओरडलो. मनात आणलं तर एका क्षणात त्या रत्नभांडारात जाऊन उभा राहू शकेन.'' संन्याशाचे बोलणें ऐकून मृत्युंजयाने त्यांचे पाय धरले व तो म्हणाला, ''तुम्ही संन्यासी आहात, तुम्हाला ह्या धनाची गरज नाही – पण मला त्या भांडारात न्या. मला त्या धनापासून वंचित करू नका.''

संन्यासी म्हणाला, ''आज मी शेवटच्या बंधनातूनही मोकळा झालो. तू, मला मारलेला दगड मला लागला नाही, पण माझं मोहाचं आवरण त्यानं फाडलं. तृष्णेचं कालरूप आज मी पाहिलं. आज, इतक्या दिवसांनी, माझे गुरु–परमंहसदेव–ह्यांच्या निगूढ, शांत हास्यानं, माझ्या अंतरातील कल्याणदीप अखंड तेवण्यासाठी लावला.''

कथा

मृत्युंजय संन्याशाचे पाय धरून, काकुळतीने, पुन्हा पुन्हा विनवू लागला, ''तुम्ही मुक्त आहात – पण मी नाही. मला मुक्ती नको आहे. ह्या ऐश्वर्यापासून मला वंचित करू नका.''

''तर मग हा घे तुझा कागद आणि शोधता आलं तर शोध धन.'' संन्यासी म्हणाला.

संन्याशाने त्याचा दंड आणि तो कागद मृत्युंजयजवळ ठेवला आणि तो

गुप्तधन (भाग ३)

लेखक : रवीन्द्रनाथ टागोर

अनु: डॉ.सौ. मृणालिनी प्र. गडकरी

तेथून निघून गेला. मृत्युंजय याचना करीतच होता, '' माझ्यावर दया करा.मला सोडून जाऊ नका. – मला ते धन दाखवा.''

पण त्याला कहीच उत्तर मिळाले नाही.

मग तो दंड घेऊन चाचपडत भुयारातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागला.पण वाट अत्यंत बिकट होती – भूलभुलैयासारखी वारंवार अडथळे येऊ लागले.अखेर चकरा मारून मारून दमल्यावर तो एके ठिकाणी आडवा झाला. झोप यायला त्याला वेळ लागला नाही.

जाग आल्यावर, रात्र आहे का दिवस, वेळ किती झाला, हे कळायला त्याला काहीच मार्ग नव्हता. त्याला खूप भूक लागली होती. म्हणून त्याने उपरण्यात बांधलेले पोहे खाल्ले. चाचपडत बाहेर येण्याचा मार्ग तो पुन्हा शोधू लागला. पण ठिकठिकाणी पुन:पुन्हा खुंटलेली वाट पाहून तो मटकन खालीच बसला.''संन्यासीबाबा, तुम्ही कुठं आहात?'' शेवटी त्याने ओरडून विचारले. जवळूनच उत्तर आले, ''मी तुझ्याजवळच आहे. काय पाहिजे सांग.'' मृत्युंजय कातर स्वरात म्हणाला, ''दया करा. धन कुठं आहे तेवढं मला सांगा.''

मग मात्र काहीच हालचाल झाली नाही. मृत्युंजय सारखा हाका मारू लागला. पण त्याला कोणाचीच चाहूल लागेना.

घटका, प्रहर यांचे भान हरपलेल्या त्या भुयारातील अखंड रात्रीत, पुन्हा एकदा तो ग्लानी येऊन पडला. जाग आल्यावर तो पुन्हा ओरडू लागला,''बाबा, आहात का तुम्ही?''

''इथंच आहे. काय पाहिजे?'' जवळूनच शब्द आले.

''मला आता आणखी काही नको.या भुयारातून मला बाहेर काढा.'' मृत्युंजय

''तुला धन नको?'' संन्यासी.

''नको. अजिबात नको.'' मृत्युंजय.

मग चकमक ओढल्याचा आवाज झाला आणि काही क्षणातच मशाल पेटली.

संन्यासी म्हणाला, ''ये, मृत्युंजय. चल. या भुयारातून बाहेर जाऊ या.''

''बाबा, खरंच हे सर्व व्यर्थ जाणार का? एवढे कष्ट करुनही धन मिळणार नाही का?'' मृत्युंजयने काकुळतीने असे विचारताच मशाल विझली. मृत्युंजय ओरडला, ''किती दुष्ट आहात हो बाबा तुम्ही!'' आणि तो मटकन् खालीच बसला. वेळ समजायला मार्ग नाही. सगळीकडे अंधारच अंधार. मृत्युंजयला वाटले, हा काळोख आपल्या शरीराचा व मनाचा चुरा करून टाकणार! सूर्यप्रकाश आणि धरतीचे वैचित्र्य पाहण्यासाठी त्याचा जीव व्याकुळ झाला. तो म्हणाला, ''संन्यासी बाबा, अहो निष्ठुर बाबा, नका हो असं करू. मला धन नको. मला इथून बाहेर न्या.''

''धन नको ना? मग माझा हात धरून माझ्याबरोबर चल.'' ह्या वेळी संन्याशाने मशाल पेटविली नाही. एका हातात दंड दुसऱ्या हातात संन्याशाचे उपरणे धरून मृत्युंजय हळूहळू चालू लागला. बराच वेळ वेडीवाकडी वळणे घेतल्यावर, एके

ठिकाणी, संन्याशाने त्याला थांबविले. मग एका गंजलेल्या लोखंडी दाराची करकर ऐकू आली. संन्यासी मृत्युंजयचा हात धरून म्हणाला, ''ये.''

मृत्युंजय पुढे झाला. संन्याशाने मशाल पेटविताच त्याचे डोळे आश्चर्याने विस्फारलेच. चारी बाजूला, भिंतीवर सोन्याचे पत्रे लखलखत होते. जणू भूमातेच्या पोटात दडलेला सूर्यप्रकाशच! मृत्युंजयचे डोळे चमकले. तो वेड्यासारखा ओरडू लागला,'' हे सोनं माझं आहे. - काही झालं तरी मी हे टाकून जाणार नाही.''

''ठीक आहे. ही मशाल मी इथं ठेवतो आहे.'' असं म्हणून, मशालीबरोबरच सातूचे पीठ, थोडे पाहे आणि तांब्याभर पाणी तेथे ठेवून संन्यासी निघून गेला. पाहता पाहता लोखंडी दार बंद झाले.

मृत्युंजय वारंवार सोन्याला हात लावून पाहू लागला, सोन्याचे लहान-मोठे तुकडे तोडून जमिनीवर फेकू लागला, उराशी कवटाळू लागला, पत्रे एकमेकांवर आपटून आवाज करू लागला, सर्वांगावर पत्रा गुंडाळून सोन्याच्या स्पर्शसुखाचा अनुभव घेऊ लागला, शेवटी दमून सोन्याच्या पत्र्यावरच झोपी गेला.

उठून पाहतो तर, चारी बाजूला सोने नुसते झगमगत होते. सोने...सोने...सोने.

आणखी काहीच नाही. मृत्युंजयला वाटले पृथ्वीवर सकाळ झाली असेल,सर्वजण आनंदात कामाला लागले असतील. सकाळच्या वेळी, तळ्याकाठच्या बागेतून, त्याच्या घरात एक प्रकारचा सुवास येई. कल्पनेनेच त्याला तो जाणवू लागला. तळ्यात बदके कलकलाट करीत,डुलत डुलत तरंगताहेत, त्याच्या घरची मोलकरीण, पदर खोचून, हातात पितळ – काश्याच्या ताट–वाट्या घेऊन तळ्यावर चाललीय, असे दृश्य त्याच्या डोळ्यांसमोर स्पष्ट उभे राहिले.

मृत्युंजय दार ठोठावून हाका मारू लागला, ''अहो संन्यासीबाबा, आहात का? मला बाहेर जायचंय्. पण बरोबर सोन्याच्या पत्र्याचा एखाद–दुसरा तुकडा मी नेऊ शकणार नाही का?''संन्याशाने काहीच उत्तर न देता, नवीन मशाल पेटविली. एक कमंडलू भरून पाणी व मूठभर पोहे ठेवून तो बाहेर निघून गेला. दार बंद झाले.

मृत्युंजयने सोन्याच्या पातळ पत्र्याचे दुमडून तुकडे–तुकडे केले. मातीच्या ढेकळाप्रमाणे तो ते चारी बाजूला फेकू लागला. काही वेळा तो दाताखाली सोने चावून त्यावर व्रण पाडीत होता, तर कधी सोने पायाखाली तुडवत होता. मनोमन म्हणत होता की, असे सोन्याशी खेळणारे किती सम्राट जगात असतील? तो बेभान झाला होता. त्या सर्व सोन्याचा चुरा करून, धुळीसारखा झटकावा आणि अशा प्रकारे पृथ्वीवरच्या सर्व सुवर्णलुब्ध राजा–महाराजांची जिरवावी, अशी त्याला इच्छा झाली.

सोन्याशी खेळता खेळता, मृत्युंजय थकून झोपून गेला. उठून पाहतो तर सगळीकडे फक्त सोनेच सोने. मग मात्र दार ठोठावून तो ओरडू लागला, ''अहो संन्यासीबाबा, मला हे सोनं नको हो! खरंच नको!''

पण दार उघडले गेले नाही. हाका मारून, मारून मृत्युंजयचा आवाज बसला, पण दरवाजा काही उघडला नाही.त्याने सोन्याचे गोळे दारावर मारले, पण काहीच उपयोग झाला नाही. मृत्युंजयची छाती दडपली. म्हणजे आता तो संन्यासी येणारच नाही का? ह्या सोन्याच्या तुरुंगात आपण तीळा-तीळाने सुकत जाऊन मरणार का?

आता सोन्याला पाहून त्याला शिसारी येऊ लागली. भीषणतेच्या नि:शब्द, भेसूर हास्याप्रमाणे हे सोन्याचे खांब होते. त्यांत स्पंदन नव्हते, परिवर्तन नव्हते. मृत्युंजयच्या हृदयातील कालवाकालव व व्याकुळता ह्याची त्यांना जाणीव नव्हती, त्याच्या वेदनेशी त्यांचा संबंध नव्हता, ह्या सोन्याला प्रकाश नको होता, आकाश नको होते, वारा नको होता; प्राण नको होते, मुक्ती नको होती. ते त्या अनंत काळोखात, उज्जव, कठीण व स्थिर होऊन चिरंतन काळ उभे होते.

धरतीवर आता तिन्हिसांजा झाल्या असतील का? अहाहा ! काय ते संध्या-समयीचे सुवर्ण ! ते क्षणभर डोळ्याला भुरळ पाडते आणि रडत-रडत निरोप घेऊन अंधारात लुप्त होते. मग संध्या तारा झोपडीच्या अंगणात टक लावून पाहात राहतो. गोठ्यात दिवा लावून, गृहलक्ष्मी घरात सांजवात लावते. मंदिरात अविरत घंटानाद होऊ लागतो.

गावातल्या घरांतल्या, लहान-सहान गोष्टी मृत्युंजयला मोठ्या आकर्षक दिसू लागल्या. संध्याकाळी, अंगाचे वेटोळे करून, अंगणात झोपणाऱ्या, त्याच्या भोळ्या कुत्र्याच्या आठवणीनेही तो कासावीस झाला. धारागोलमध्ये ज्या वाण्याच्या दुकानात मृत्युंजयने आश्रय घेतला होता, त्याची मृत्युंजयला आठवण आली. तो वाणी आता दिवा मालवून, दुकान बंद करून, हळूहळू घराकडे निघाला असेल. त्याला तो वाणी 'अत्यंत सुखी' वाटू लागला. आज वार कोणता आहे कोण जाणे! रविवार असेल, तर बाजाराला आलेले लोक आपापल्या घरी परतत असतील, चुकामूक झाल्याने एकमेकांना हाका मारीत असतील, गटागटाने होडक्यातून नदीपार होत असतील, पायवाटेने शेतांच्या बांधांवरून गावाच्या रस्त्यावर पसरलेला कळकीचा पाचोळा तुडवीत, हातात एखाद-दुसरा मासा हलवीत, डोक्यावर टोपल्या घेऊन,अंधारातून, चांदण्यांच्या मंद उजेडात, शेतकरी गावाकडे निघाले असतील.

जगाच्या पाठीवरील, ह्या विचित्र, प्रचंड, सतत स्पंदन पावणाऱ्या जीवनयात्रेत, अती तुच्छ, अती दीन होऊन, स्वत:चे जीवन मिसळून

टाकण्याचे आवाहन, मातीच्या अनेक थरांचा भेद करून, मृत्युंजयपर्यंत येऊन पोहोचले. हे जीवन, हे आकाश, हा प्रकाश, त्याला पृथ्वीवरच्या सर्व रत्नमाणकांपेक्षा अमोल वाटू लागला. केवळ एकच क्षण त्या श्यामल धरतीच्या, धुळीने भरलेल्या मांडीवर, त्या उन्मुक्त निळ्या आकाशाखाली, तृणपानांच्या सुवासाने दरवळलेल्या हवेत, एक दीर्घ व अखेरचा श्वास घेऊन मरण आले, तरी जीवनाचे सार्थक होईल, असे मृत्युंजयच्या मनात आले.

त्याच क्षणी, दार उघडले गेले. आत येऊन संन्याशाने विचारले, '' मृत्युंजया, काय पाहिजे तुला?''

मृत्युंजय बोलून गेला, ''आणखी काहीच नको. – मला फक्त ह्या भुयारातून, ह्या अंधकारातून, ह्या भुलभूलैयातून, ह्या सोन्याच्या तुरुंगातून बाहेर पडायचंय्, मला प्रकाश हवा, आकाश हवे, मुक्ती हवी.''

''ह्या सुवर्णभांडारापेक्षा मूल्यवान असं रत्नभांडार इथं आहे. एकदा जायचं का तिथं? संन्याशाने विचारले.

मृत्युंजय तात्काळ उत्तरला, ''नाही. मुळीच जायचं नाही.''

संन्याशाने पुन्हा विचारले, ''एकदा सुद्धा ते पाहायची उत्सुकता नाही का तुला?''

''नाही. मला ते पाहायचं सुद्धा नाही. कफनी घालून भिक्षा मागायला लागली तरी चालेल, पण इथं एक क्षणभरही



थांबायची माझी इच्छा नाही.'' मृत्युंजयने उत्तर दिले.

संन्यासी म्हणाला,''ठीक आहे. ये तर मग.''

मृत्युंजयचा हात धरून, संन्यासी त्याला खोल विहिरीच्या समोर घेऊन आला.मग त्याच्या हातात तो कागद ठेवीत, त्याने विचारले, ''आता ह्याचे काय करणार आहेस?''

मृत्युंजयने त्या कागदाचे तुकडे तुकडे करून, विहिरीत फेकून दिले.

(समाप्त)

करण्या मर्दन अन्यायाचे, अहंकार आणिक द्वेषाचे, शब्दांचे घेऊन धुमारे, वीज कडाडत यावी, कविता अशी स्फुरावी.

निर्णय क्षमता विकास
भाग – ४

डॉ. वनिता पटवर्धन

निर्णय घेताना कोणकोणत्या पायऱ्या चढून जायच्या ते लक्षात आहे ना? त्या चढून जाताना एखादा निर्णय घेतला ना? असा निर्णय घेण्यासाठी मदत म्हणून इथे प्रत्येक पायरीसाठी एकेक चौकट दिली आहे. चौकटीतील ओळींवर मजकूर लिहीत जायचा. लिहिताना खाडाखोड झाली तरी काहीच हरकत नाही. अशाच चौकटी आखून घ्या किंवा प्रत्येक चौकोनासाठी स्वतंत्र कागद वापरा. नमुन्यासाठी या पायऱ्यांप्रमाणे एक निर्णय घेऊन दाखवला आहे, तेही पाहा.

निर्णय प्रक्रिया

१) स्वत:ला ओळखा

- मला शाळेत क्लासला जायला – यायला त्रास होतोय्.
- माझी आर्थिक परिस्थिती बेताची आहे.
- मला खो-खो खेळण्यात रस आहे.
- माझे वय १६ वर्षांचे आहे.

२) नेमका पेच मांडा

- मला रु.१२००/-ची नवी सायकल विकत घ्यायची आहे. त्यापैकी रु.६००/- माझ्याकडे आहेत. सुट्टीमध्ये आणखी रु. ६००/-जमवण्यासाठी एके ठिकाणी रोज संध्याकाळी ४ ते ८ काम मिळाले आहे. पण त्याचवेळी खोखोचा

बुद्धीच्या प्रांगणात

सराव असतो. व्यवस्थित सराव केला. तरच सामन्यात भाग घेता येईल. एकाचवेळी दोन गोष्टी कशा करू?

३) माहिती घ्या

- नव्या सायकलची सगळी रक्कम सायकल खरेदी करतानाच दिली पाहिजे असे नाही. दुकानदार ओळखीचा असल्याने काही पैसे २-३ महिन्यात दिले तरी चालतील.
- एक जुनी सायकल रु.७००/- ला आहे.
- रोज सकाळी १८ वर्षांवरील खेळाडू खोखोचा सराव करतात.
- कामाच्या ठिकाणी गुरुवारी तर खेळाच्या सरावाला शनिवारी सुट्टी असते.
- चार तासांऐवजी दोन तास काम केलेले चालेल, तसे पैसे कमी मिळतील.

४) पुन्हा नेकमा पेच मांडा

- नवी सायकल घेऊ की खोखो च्या सामन्यात भाग घेऊ?

५) अनेक पर्याय शोधा

- कुणाकडून तरी पैसे उधार घ्यावे.
- कामाच्या वेळात सवलत मागावी आणि थोडा वेळ खोखो चा सराव करावा.
- सायकल दुकानदारांकडे २-३ ऐवजी

५-६ महिन्यांनी उरलेले पैसे देण्याची सवलत मागावी.

- जुनी सायकल विकत घ्यावी.
- सकाळी १८ वर्षांवरील खेळाडूंबरोबर खोखो चा सराव करावा.
- .....

६) परिणामांविषयी अंदाज बांधा

- उधार मागण्याचा मला संकोच वाटतो.एवढी रक्कम कोण देईल?
- कामात सवलत मागितली तर पैसे कमी मिळतील आणि थोडा वेळ खेळून खोखोच्या सामन्यात घेणार नाहीत.
- सायकल-दुकानदाराकडे आणखी सवलत मागण्याचा संकोच वाटतो. तो आणखी सवलत देणारही नाही.
- जुनी सायकल घेतल्यावर पैशांचा फारसा प्रश्न येणार नाही. पण जुनी सायकल त्रास देईल. तिला नव्याची सर कशी येणार?
- सकाळी दुसऱ्या गटाबरोबर सराव करून सामन्यात निवड होईल का ही शंका आहे. तसा गुरुवारी आपल्या गटाबरोबर सराव करता येईल.
- .....

७) निर्णय घ्या

- जुनी सायकल विकत घ्यायची.
- त्यासाठीचे रु.६००/-आहेतच.आणखी रु.१००/-मिळवण्यासाठी पूर्वी ठरलेले काम खोखोच्या सरावाचा वेळ सोडून करावे. ते जमू शकत नसेल तर रु.१०० मिळविण्यासाठी दुसरे कोणते तरी काम पहावे.
- सायकल जुनी असली, तरी आत्ता काम भागेल.
- नव्या सायकलची शान आत्ता मिळणार नाही!

८) कृती करा

- ठरवल्याप्रमाणे केले!
- त्याच कामाच्या ठिकाणी आठच दिवस काम करून रु. १००/- मिळवले. जमले.

९) पडताळा घ्या

- स्वत:ची सायकल आल्यामुळे मी तर खुशीत आहे!
- 'जुनीच सायकल घेतलीस का?' असे कुणी चिडविले! मी तिकडे दुर्लक्ष केले.
- सायकल जरा जड असल्यामुळे चालवायला त्रास होतोय्.
- उन्हाळ्यात तर खूप घाम येतोय्.
- खोखो च्या सामन्यासाठी निवड झाली आहे!
- जमेल तसे पैसे साठवून लवकरात लवकर नवी सायकल घ्यायची हे नक्की!

निर्णय अंमलात आणताना :

आपण कागदावर तर सगळे काम केले. तसचे ते प्रत्यक्ष पेचप्रसंग येईल तेव्हाही करायचे आहे, हे लक्षात ठेवा. काही वेळा निर्णय अमलात आणताना म्हणजेच कृती करण्यापूर्वी निर्णय बदलावासा वाटतो आणि पंचाईत होते! काही जणांच्या बाबतीत हे बऱ्याच वेळा होते. आपण एकदा केलेली निवड बदलूया आणि दुसरेच निवडूया असे वाटू लागते. शेवटच्या टप्प्यांमध्ये पाऊल अधांतरीच रहाते! तुमच्या बाबतीत असे

(पान १२ वर पुढे चालू)

कर्माचे ज्या वर्म कळाले धर्म वेगळा काय असे, कष्याने जे साध्य होत त्या स्वयंप्रकाशी सूर्य दिसे.

निर्णय प्रक्रियेच्या पायऱ्या

(पान १० वरून पुढे चालू)

घडते का? अशी काही उदाहरणे पुढे दिली आहेत.त्यातील प्रत्येक निर्णय बदलला तर काय होईल?

१) चमचमीत भेळेची (मागणी केलीय्) ऑर्डर नोंदवली आहे. भेळ तयार होऊन समोर आली आहे आणि लक्षात आले की भेळेत कोथींबीरच नाही! मला कोथींबीरी शिवाय भेळ अजिबात आवडत नाही!

२) दुकानात २०रु. चे एक चांगलेसे पुस्तक निवडले. पैसे द्यायच्या वेळी, त्या पुस्तकाची वाढलेली किंमत २५ रु. असल्याचे दुकानदाराने सांगितले.

३) आपल्या कंपूबरोबर सहलीला जाऊन मौज-मजा करायचे ठरवले आहे. त्याचवेळी घरची मंडळीही दुसरीकडे सहलीला जाणार आहेत. एकाएकी तुम्हाला एकटे वाटायला लागले आणि कंपूच्याऐवजी घरच्यांबरोबर सहलीला जाण्याची तीव्र इच्छा होते.

४) बागेत वाफे करून टोमॅटो, वांगी लावण्यासाठी खणले, बिया आणल्या. बिया पेरण्याची तयारी करत असताना शेजारचे काका म्हणतात की, त्यापेक्षा डाळींब, चिक्कू अशी कायमची फळे देणारी झाडे का नाही लावत? त्यांचे म्हणणे पटते.

असा निर्णय बदलण्याचा विचार आपल्या मनात येऊ शकतो.मग त्यामुळे काय होईल, त्यामध्ये आता फायदे जास्त होतील की तोटे, याचा विचार करून निर्णय बदलता येईल. वरच्या पहिल्या उदाहरणामध्ये, भेळ परत केल्यावर काय होईल? बिन कोथींबीरीची भेळ खाऊन पाहाता येईल का? आपण कोथींबीरीच्या ताब्यात जायचे की कोथींबीरीला आपल्या ताब्यात ठेवायचे? असा विचार करून निर्णय बदलायचा की नाही ते ठरवायचे! चुकीचा निर्णय घेण्यापेक्षा तो अगदी शेवटच्या टप्प्यात असताना, बदलणे केव्हाही चांगलेच. पण अशी निर्णय बदलण्याची वेळ का येते, ते पाहायला हवे. कधी आपण संपूर्ण माहिती मिळवत नाही, कधी चुकीची माहिती मिळते, कधी स्वत:ची आवड-निवड नीट कळलेली नसते, तर कधी लहर फिरते! त्यामुळे निर्णय घेताना काळजी घ्यायला हवी. म्हणजे मग पुढे जाण्यासाठी उचलेले पाऊल ठरल्यापेक्षा दुसरीकडे टाकावे लागणार नाही.

एकंदरीत असे लक्षात येते की, कमी-जास्त महत्त्वाचे निर्णय घेण्याची वेळ आपल्या सर्वांवरच येते. काहीवेळा अवघड पेच प्रसंग समोर असतात. त्यावेळी आनंदाने आणि आत्मविश्वासाने निर्णय घ्यायचे आणि तेही स्वत:च घ्यायचे, दुसऱ्यावर विसंबून रहायचे नाही. आपापली मूल्ये, विचार, आवड-निवड यांवर आपण कोणता निर्णय घेतो, ते अवलंबून असते. निर्णय घेताना आणि तो

पार पाडताना जोखीम घ्यायला हवी. त्यावेळी कचरता कामा नये. विशिष्ट पायऱ्यांनी निर्णय घेतला, तर तो जास्तीत जास्त अचूक ठरेल. मात्र निर्णयाची अंमलबजावणी केल्यावर मागे वळून पाहायला हवे. आपला निर्णय कितपत योग्य होता, ते प्रमाणिकपणे अजमावून पाहायला हवे. त्यानुसार पुढच्या वेळी सुधारणा करता येते.

तर मग तुम्ही आता जबाबदारीने निर्णय घेणार ना? तुम्ही मोठे व्हाल, तेव्हा तुमच्या निर्णयाचे परिणाम तुमच्या भोवतालच्या व्यक्तींवर होणार आहेत. त्याची कल्पना आत्ताच करा. तुम्ही पाच वर्षानंतर कसे असाल याचे चित्र रेखाटा. रेखाटले? त्यावेळी तुमच्यासमोर येणारे महत्त्वाचे दोन पेचप्रसंग कोणते असतील, ते सांगा. मग कोणता निर्णय घ्याल, ते लिहा.

तुमच्या कंपूमध्ये आपापले पेचप्रसंग आणि त्यावरील निर्णय याविषयी चर्चा

केलीत, तर खरंच खूप गंमत येईल.आणि आत्ताचा सुट्टीचा वेळ कारणी लागेल!

गेले वर्षभर 'बुद्धीच्या प्रांगणात' आपण 'खेळीयाड' खेळलो! मला तर खूप मजा वाटली. तुम्हाला देखील वाटली ना?

आमचे वाचक समजूतदार आहेत ।

नुकतेच नेतृत्व प्रशिक्षण शिबिर व महाराष्ट्रातील १५ ठिकाणची व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे यशस्वीपणे पार पडली. नेतृत्व प्रशिक्षण शिबिरासाठी महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांमधून ५८ मुले व ३४ मुली आल्या होत्या. त्यातली २२ मुले व १५ मुली व ज्ञान प्रबोधिनीच्या युवक युवती विभागांमधील ७० प्रतिनिधींनी मिळून महाराष्ट्रात १५ शिबिरे घेतली. या शिबिरांमध्ये एकूण मिळून १२२५ मुलामुलींनी भाग घेतला. या सर्व शिबिरांचा समारोप १० जूनला झाला. सर्व ठिकाणच्या पालक मेळाव्यांनाही उत्स्फूर्तपणे छान प्रतिसाद मिळाला. छात्र प्रबोधन हे निव्वळ मासिक न राहाता त्या द्वारा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकसनाची चळवळ आकार घेऊ लागली आहे. या सर्व शिबिरांच्या गडबडींमुळे हा अंक व पुढचे दोन अंक काढण्यास खूपच उशीर झाला त्याबद्दल क्षमस्व. या शिबिरांची निवडक छायाचित्रे पुढील अंकात तर सविस्तर वृत्त त्या पुढील अंकात पाहायला व वाचायला मिळेल. पुढचे दोन्ही अंक १०-१० दिवसांच्या फरकाने तुमच्यापर्यंत पोहोचतील. आपल्या सहकार्याबद्दल व समजूतदारपणाबद्दल खात्री आहे व म्हणूनच धन्यवाद!

विज्ञानाच्या चष्म्यातून

काचेवर प्रयोग

प्रा. सविता देशपांडे

परीक्षा संपल्या. शाळेला सुट्ट्याही लागल्या. सुट्टीमध्ये तुम्ही वेगवेगळ्या छंदवर्गांना जात असाल, नवीन काही तरी शिकावे असं तुम्हाला वाटत असेल, वेगवेगळ्या संस्थांनी घेतलेल्या विविध प्रकारच्या शिबिरांना जाण्याचे बेत आखत



असाल. पाहुणे, बहीण-भाऊ आले असतील. त्यांच्याबरोबर मस्तपैकी पोहायला, सायकल फिरवायला, कैऱ्या पाडायला मजा येत असेल. मग अशावेळी जर म्हटलं की हे सगळं करता करताच शास्त्रातले वेगवेगळे प्रयोगही करता येतील, तर आश्चर्य वाटतंय ना? पण मित्रांनो तुम्हाला हे करता येईल बरं का!

ज्ञान प्रबरोधिनीमधील इ. ८ वी च्या विद्यार्थि-विद्यार्थिनींनी यावर्षी रसायनशास्त्रात आपण काय शिकणार, कसे शिकणार, वेगवेगळे प्रयोग कसे करता येतील, त्यासाठी कुठे कुठे जावे लागेल, काय साहित्य गोळा करावे लागेल हे सर्व स्वत: ठरवलं आणि वर्षभर या विषयाचा अभ्यास केला. त्यांनी 'काच' हा विषय निवडला. बरं, एकच एक पाठ्यपुस्तकही नव्हतं. मग पाच पायऱ्यांमध्ये अभ्यास करायचं ठरलं.

१) काचेचा इतिहास २) काचेचे प्रकार ३) काचेचे गुणधर्म व उपयोग ४) काच तयार करण्याची पद्धत (प्रक्रिया) ५) काचेवरचे विविध प्रयोग.

ग्रंथालयाचा उपयोग यासाठी त्यांनी केला. तेथील वेगवेगळ्या संदर्भ ग्रंथांतून प्रथम आवश्यक माहिती गोळा केली. काच तयार करण्याची प्रक्रिया अभ्यासली. पण काच कशी तयार होते हे प्रत्यक्ष पाहणेही

आवश्यक होते. पुण्यापासून ४० कि.मी. अंतरावर असलेला तळेगावचा काच कारखाना पाहायला सगळेजण गेले. काच तयार करण्याची प्रक्रिया, भट्टी, काचेच्या रसापासून वस्तू तयार करण्याचे साचे व पद्धत हेही त्यांनी पाहिले. चष्म्याची भिंगे तयार करण्याच्या कार्यशाळेला भेट दिली. काचांचे उपयोग कोठे आणि कसे केले जातात हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी रुग्णालये, दुकाने, प्रयोगशाळा, बांधकामाची ठिकाणे, चष्म्याची दुकाने याठिकाणी जाऊन लोकांशी चर्चा केली.

अजून स्वत: ह्या प्रकारचे काहीच प्रयोग केले नव्हते. म्हणून आता सर्वांनी एकत्र बसून कल्पनास्फोट तंत्राचा वापर करून कोणते प्रयोग करता येतील याविषयी कल्पना सुचविल्या. त्यामधील काही प्रयोग करण्याचे ठरले. त्यासाठी काचांचे विविध प्रकार गोळा करणे आवश्यक होते. मुलांनी घरून, वेगवेगळ्या दुकानांमधून, वर्क शॉप्समधून, बांधकामाच्या ठिकाणाहून, रस्त्यातून काचांचे भरपूर प्रकार गोळा केले. पाच पाच विद्यार्थ्यांच्या गटांनी प्रयोग करण्याचे ठरले.प्रयोगाचे साहित्य, पद्धत हेही त्यांनीच ठरविले. खरं म्हणजे मित्रांनो, हे तुम्हालाही जमेल. पाहा बरं करून. त्यांनी केलेल्या प्रयोंगातील काही प्रयोग असे.

१) **विविध रसायनांचा काचेवर होणारा परिणाम** – काचेचे वेगवेगळे प्रकार निवडून त्यावर विविध रसायनांचा काच थंड व गरम असताना परिणाम पाहिला. तुम्हाला घरी थंड व गरमपाणी, तेल, दूध, कणिक, हळदीचे पाणी, लोणचे, शेण, राख यांचा परिणाम पाहता येईल.

२) **उष्णतेचा परिणाम** – प्रत्येक प्रकारची काच तापविल्यावर तडकते की तापवून थंड पाण्यात ठेवल्यावर तडकते हे पाहता येईल. यासाठी घरातील गॅस अथवा स्टोव्हचा वापर करा. काच फुटताना तिचे जे तुकडे होतात त्याचा एकच एक निश्चित आकार दिसतो का? फुटताना तिचे टोकदार तुकडे होतात का? एखादी काच फुटताना तिचा बारिक चुरा होतो का? याचा अभ्यास करा.

३) **काचेची क्षमता अभ्यासणे** – काचांवर होणारा विविध प्रकारच्या धक्क्यांचा, वजनांचा परिणाम, उष्णतेचा परिणाम व त्यामुळे त्यांच्या क्षमतेवर होणारा परिणाम, वेगवेगळ्या उंचीवरून टाकले असता काचेची टिकण्याची क्षमता तपासून पाहता येईल.

४) हल्ली काचेऐवजी मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक वापरतात. **प्लॅस्टिक व काच या दोन पदार्थांमधील गुणात्मक तुलना** करण्याचा प्रयत्न करता येईल. काच व प्लॅस्टिकचा ठिसूळपणा, उष्णता शोषून घेण्याची क्षमता (यासाठी दोन वेगवेगळ्या काच व प्लॅस्टिकच्या भांड्यांमध्ये पाणी ठेवून ते सूर्यप्रकाशात ठेवा. ठराविक वेळाने पाणी किती तापले हे मोजा) अन्न दोन्हीपैकी कोणत्या भांड्यात अधिक काळ टिकते ते पाहा. दोन्ही पदार्थ जाळून पाहा.

५) **चिकटविण्याची क्षमता(**Adhesive force of glass) : काचेच्या विविध प्रकारच्या व विविध काचांच्या तुकड्यांवर काही द्रव तसेच घनपदार्थ किती प्रमाणात चिकटतात हे पाहता येईल.

उदा – पाणी, अश्रू, पेट्रोल, लाळ, लिंबाचा रस, टूथपेस्ट, गव्हाचे अथवा ज्वारीचे पीठ, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, राख, मेंदी, मध, रॉकेल, साबण, शाम्पू इ. पदार्थ कोणत्या काचेवर बराच काळ कोरड्या स्थितीत चिकटून राहतात ते पाहा.

यानंतर वस्तू चिकटवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध पदार्थांमधील (उदा.डिंक, स्टीकफास्ट,फेव्हिकॉल इ.) कोणत्या पदार्थाने काच उत्तमप्रकारे चिकटते ते पाहा.

६) **खेळणी तयार करा** : काचेच्या बांगड्या, नळ्या, कांड्या यापासून गॅसवर तापवून विविध आकार व खेळणी तयार करा. पोकळ काचेच्या नळीला उष्णता दिली आणि ती ताणली की सुंदर कॅपिलरी तयार होते. करून पाहा.

७) काचेच्या नळया तापवून त्या वाकवण्यावर कोणकोणत्या घटकांचा परिणाम होतो हे अभ्यासा. उदा – नळीचा व्यास, काचेचा प्रकार, उष्णतेचे स्त्रोत वगैरे.

अशा प्रकारे काचेवर विविध प्रयोग केले. असेच तुम्हाला आणखी कोणकोणत्या पदार्थांवर प्रयोग करता येतील?

१) प्लॅस्टिक २) नैसर्गिक व कृत्रिम धागे ३) कागद वगैरे. हा अभ्यास करताना नैसर्गिक व कृत्रिम धागे जाळून बघा, त्यावर होणारा एखाद्या रसायनाचा परिणाम पाहा, कापसापासून बारीक धागा काढण्याचा प्रयत्न करा, संत्रे–मोसंबीच्या सालातील धाग्यापासून सूत काढा, एखाद्या ठिकाणी जाऊन हातमाग पाहा, चरख्यावर सूत विणून बघा. कशाकशापासून धागे विणून कापड करता येईल पाहा.

एखाद्या कापड विणण्याच्या तसेच धागे तयार करण्याच्या कारखान्याला भेट द्या. कृत्रिम व नैसर्गिक धाग्यांची गुणात्मक तुलना करा. उदा. दोन्हीच्या धाग्यांना वजन बांधून त्यांची शक्ती अजमावणे, त्या दोन्हीवर होणारा उष्णतेचा परिणाम अभ्यासणे वगैरे.

अशा प्रकारे सुट्टीमध्ये ही आपल्याला स्वत: ठरवून काही प्रयोग करून बघता येतील.

गिर्यारोहणाचे शिक्षण कोठे?

गिर्यारोहण गाथा

आनंद पाळंदे

गिर्यारोहणातील सर्वात जास्त सुख हिमाच्छादित शिखर काबीज केल्यावर मिळते. या क्रीडेचा हा तिसरा टप्पा. मात्र या टप्प्यात अनेक निसर्गदत्त धोक्यांना सामोरे जावयाचे असते, मानवी क्षमतेबाहेरील शक्तींनाअजमावयाचे असते आणि त्यामुळेच याचे पद्धतशीर शिक्षण घेतलेले चांगले.

डोंगरयात्रा या पहिल्या टप्प्यामध्ये अंगभूत गुणांचा वापर करीत गिर्यारोहण क्रीडेची ओळख आपली आपणच करून घेता येते. कातळारोहण देखील बऱ्याचशा सुरक्षाविषयक क्लुप्त्या वापरून आत्मसात करता येते. मात्र हिमालयातील तिसऱ्या टप्प्यात प्रवेश करण्यासाठी मुद्दामहून शिक्षण

घेणे अनिवार्य आहे. कारण नुसते हिम बघण्यासाठीही सोयींनी युक्त जागा सोडून कित्येक किलोमीटर अंतर्भागात काय आहे हे पाहण्यासाठी प्रत्यक्ष त्यात पाऊल बुडवायला लागते.

हल्ली बरेचसे टिन्या आणि मिनी हिमालयात ट्रेकिंगची धमाल करावयास जातात. याची गिर्यारोहण म्हणून बऱ्याच वेळा गफलत केली जाते. पण हे सर्व पर्यटकीय स्वरुपाचेच असते. प्रत्याक्षात गिर्यारोहण हे खूपच खडतर अन् माणसांच्या हिम्मतीची परीक्षा पाहणारे, कसदार, अनुभव देणारे असते आणि अर्थात त्याचे

शिक्षणवर्गही तसेच असतात. त्यामुळे असे शिक्षण घेण्यासाठी खरोखरच ज्यांना रस आहेअशांनीच जावे.आणि त्यासाठी पूर्वतयारीही करावी कारण सरकारही या प्रशिक्षणार्थीमागे शेकडो रुपये अनुदानाद्वारे खर्च करत असते.

हे प्रशिक्षण देणाऱ्या चार प्रमुख संस्था भारतातआहेत.उत्तर प्रदेशातील उत्तरकाशी येथील नेहरु पर्वतारोहण संस्था,दुसरी दार्जिलिंग (पश्चिम बंगाल) येथील हिमालय पर्वतारोहण संस्था, तिसरी मनाली (हिमाचल प्रदेश) येथील पश्चिम हिमालय पर्वतारोहण आणि अन्य क्रीडा संस्था,चौथी सोनम म्यात्सो पर्वतारोहण संस्था,ही गंगटोक येथे आहे.प्रशिक्षणवर्गासाठी शिष्यवृत्त्याही उपलब्ध आहेत.

१८ वर्षे वयावरील व्यक्तींसाठी सर्वसाधारणपणे ३० दिवसांच्या मुदतीसाठी असलेल्या वर्गांसाठी रु. १०००/-शुल्क आकारले जाते.याशिवाय सात-आठशे रुपये प्रवास खर्च येतो.प्राथमिक आणि प्रगत असे दोन प्रशिक्षण वर्ग असतात.प्राथमिक प्रशिक्षण वर्गात 'अ' श्रेणी मिळविणाऱ्यांनाच प्रगत शिक्षणक्रमासाठी प्रवेश मिळतो. प्रवेशासाठी इथेही अर्थात रांग लावावी लागते. म्हणजे १ ।। ते २ वर्षानंतरच्या वर्गासाठीचा प्रवेश मान्य होतो.एक प्रकारे हेही चांगलेच. त्यामुळे पूर्वतयारीसाठी पुरेसा वेळ मिळतो.

पूर्वतयारीत प्रामुख्याने शारीरिक क्षमता वाढवण्याकडे लक्ष द्यावे. त्याचबरोबर कातळारोहण कौशल्यही आत्मसात करावे. शारीरिक क्षमतेसाठी अर्थातच डोंगर चढणे उतरणे याचा सतत सराव करणे याखेरीज दुसरा सोपा मार्ग नाही.योगासनांमधील पश्चिमोत्तानासन,भुजंगासन,सर्वांगासन ही आसने करावीत यामुळे पाठीचा कणा सुदृढ व बळकट राहतो.

पुर्वी केलेल्या डोंगरयात्रा पाठीवर १५ किलो वजन लादून कराव्यात. ठराविक वेळेनंतर घोट घोट पाणी प्यायची सवय लावावी.एकच डोंगर पाठीवर वजन घेऊन चढावा,उतरावा. दर आठवड्याला सात-आठशे मीटर चढाई-उतराई पाठीवर वजन घेऊन करता आली तर उत्तम प्रशिक्षण वर्गासाठी जाण्याचा दिवस दोन महिन्यांवर आला की वजनक्षमता २० किलोपर्यंत न्यावी.अर्थात स्वत:च्या वजनाच्या १/३ पेक्षा फार जास्त वजन मात्र घेणे टाळावे. सलग सात-आठशे मीटर उंचीचा डोंगर जवळ नसल्यास पुन:पुन: चढउतार करून अपेक्षित उंचीचे साध्य गाठावे.

आसने व दमश्वासाच्या व्यायामात कातळारोहणाची जोड द्यावी.कातळटप्पा ज्या मार्गाने चढला त्यामार्गाने उतरता आला



की पुरेसे कौशल्य प्राप्त होते.

उत्तरकाशीच्या नेहरू पर्वतारोहण संस्थेचा वर्ग मार्च आणि सप्टेंबरमध्ये असतो. मार्चमध्ये हिमाच्छादन अधिक तर सप्टेंबरमध्ये ते कमी असते पण बर्फावरील चढाईचा सराव अधिक मिळतो.

संस्थेतील प्राचार्य बहुधा लष्कारातील हुद्देदार असतात आणि शिस्त पाळण्यावर त्यांचा कटाक्ष असतो. पहाटे ५।। वाजता उठवून कवायत आणि पळणे हा व्यायाम घेतला जातो. न्याहारीनंतर बसमधून तेखला गावाजवळील कातळारोहण तळापाशी नेले जाते. इथे चीड देवदारच्या जंगलातून कातळखंडापाशी पायी जावे लागते. कातळारोहण कसे करावयाचे, दोराच्या विविध गोष्टी, त्यांचे उपयोग, दोराची काळजी कशी घ्यावयाची, विविध साधने पिटॉन, कॅरॅबिनर, हातोडा यांची माहिती दिली जाते.

प्रशिक्षक उत्तम असतात. ते स्वत: कातळारोहण करताना त्यांची लय पाहून ती आत्मसात करावी.दुपारी भोजनोत्तर, व्याख्याने असतात. यात हिमालयाची ओळख, भूगोल, हवामान, धोके आणि वैद्यकीय बाबी सांगितल्या जातात.

अशा रितीने तीन दिवस वातावरण निर्मिती झाल्यावर उंच पर्वतामध्ये जाण्यासाठी आवश्यक अशी साधनसामुग्री उदा. तंबू, आईसॲक्स, बूट, थंडरोधक कपडे यांचे वाटप करतात.

अती उंचीचा म्हणजे ३००० मीटर

उंचीवरचा प्रदेश सुरू झाला की सुरुवातीला डोके जड होते, उलटीची भावना होते. पण एक दोन दिवसात हा आजार आटोक्यात येतो अन् शरीर वातावरणाशी समरस होते. शून्य तापमानाची सवय नसल्यामुळेही हुडहुडी भरते. या बदलांची जाणीव असल्यामुळे शिक्षक मंडळी योग्य त्या दृष्टीने विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवून असतातच.

तंबू-राहुटीमध्ये जर अशा वातावरणात पडून राहिलात तर आजार वाढतो. (तसे पडून राहावेसे वाटते हेही खरे) पण मनोबल उंचावून या भावनेवर मात करावयाची गरज असते आणि तंबूबाहेर जास्त वेळ काढल्यास आपण अधिक कार्यक्षम ठरतो.

इथेही सकाळी लवकर उठविले जाते आणि दुपारीच मुक्काम उभारला जातो. हिमाच्छादित भागात गेल्यावर आईस ॲक्स कशी वापरावयाची, पायाने पायऱ्या करणे, हिमउतार चढणे वा उतरणे, दोरबद्ध होणे असे सराव करवून घेतले जातात. हिमनदी भागात चढणे-उतरणे, क्रिव्हास मध्ये पडल्यास कसे बाहेर यावयाचे हेही शिकवले जाते. हिम व बर्फातील फरक कळतो.

हे सर्व जसे खडतर आहे तसेच आनंददायीही आहे. सकाळ-संध्याकाळ दिसणाऱ्या हिमालयाच्या पर्वतरांगांचे अनुपम सौंदर्याचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतात.

शिखर चढाई वा जास्तीत जास्त उंची गाठण्याचा कार्यक्रम अखेरच्या दिवशी असतो. यामध्ये आत्तापर्यंत शिकलेल्या बहुतेक कौशल्याचा वापर करावयास मिळतो, तसेच वर वर चढत जाण्यासाठीचे मनोबल अजमावता येते.

साधारण ५००० मीटर उंचीवर हिमवर्षावाचा अनुभवही मिळतो. परतीची वाट अर्थातच सुखदायी असते. त्रास संपलेला असतो. अनुभवांची शिदोरी जमा झालेली असते.

अर्थात प्राथमिक प्रशिक्षण म्हणजे केवळ ओळखच असते. प्रगत अभ्यासक्रमात शिखर चढाईचे नियोजन करून प्रत्यक्ष शिखर चढावयाचे असते. शिक्षणातून

परिचित होता येते. प्रेरणा मिळते पण खरी प्रचीती, अखेर त्याचा उपयोग करून सराव, कौशल्य वाढवून स्वत:च एखादे शिखर चढल्यावरच मिळते.

वेळ मिळाला तर खेळ...

पूजा किरपेकर,
हस्तलिखित 'हूंकार'
ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर

आम्हीच लिहिणार

खरेच, हा विषय किती सत्य परिस्थितीची आठवण करून देतो. नाही? नुसता विषय वाचल्यावरच मला कितीतरी दिवसांनी खूप-खूप खेळावंसं वाटत आहे.

सध्या आम्हा मुलांची शाळा, वरचेवर होणाऱ्या चाचण्या आणि यात उत्तम यश मिळावं म्हणून जवळजवळ अपरिहार्य झालेल्या शिकवण्या यातून सुटकाच होत नाही. शिवाय सर्व विषयांच्या शिक्षकांची, विद्यार्थ्यांने त्यांच्या-त्यांच्या विषयात पुढे यावे अशी अपेक्षा असते. त्यामुळे सध्याच्या स्पर्धात्मक युगात अभ्यासाच्या या कसोटीला उतरून खेळासाठी वेळ मिळणार तरी कसा?

आता माझ्या शाळेत खेळाची सक्ती आहे म्हणून ठीक. पण इतरांचे काय?

प्रत्येक आईवडिलांना वाटत असते की आपल्या मुलांनी मोठे होऊन, शिकून चांगले डॉक्टर, इंजिनिअर व्हावे आणि यासाठी तर खूप अभ्यासाची व खूप मार्कांची आवश्यकता असते. त्यामुळे घरूनसुद्धा आजकाल खेळाला प्रोत्साहन मिळत नाही. असे पालक फारच थोडे असतील की ज्यांना आपल्या मुलांनी खेळाडू व्हावे असे वाटत असेल. त्यामुळे आपल्याला नेहमीच घराघरातून ऐकायला मिळते, ''आधीच परीक्षा जवळ आली आहे तेव्हा आता खेळणं बंद. कुठं लागलं, आजारी पडलास तर पुन्हा नसता उपद्व्याप व्हायचा.''

आणखी आमच्या खेळावर गदा घातली आहे ती टी.व्ही. ने. टी.व्ही. वरील काही कार्यक्रम तर इतके छान व मनोरंजक असतात की तुम्हीच सांगा, त्यामुळे आम्ही त्याकडे पाठ तरी कशी फिरवणार?

यामुळेच जर एखाद्याची खेळात विशेष प्रावीण्य मिळवण्याची क्षमता असेल तर त्याला घरून परवानगीही मिळत नाही व वेळही उरत नाही.

आणि आपल्या देशात तर पुष्कळ वर्ष सराव केलेल्या खेळाडूंपेक्षा १-२ वर्षात पदवी मिळवणाऱ्यांनाच बहुतेकदा जास्त मान मिळतो.भारत सरकारही याबद्दल फारसं काहीच करत नाही.जागतिक स्तरावरचे क्रिकेटसारखे खेळ सोडल्यास इतर खेळात प्रावीण्य मिळवणाऱ्यांची धड नावेही आपल्याला माहीत नसतात.

ही खेळाबद्दलची उदासीनता काही विचारवंतांनी ओळखली आहे.पण त्यांची भाषणे ऐकूनही पालक बहुतेकदा त्यातील मर्म एका कानाने ऐकून ते दुसऱ्या कानाने सोडून देतात.

आता खेळाचे फायदे काही मी तुम्हाला सांगायला हवेत असे नाही.असे म्हणतात की Sound mind stays in sound body आणि अशा शारीरिक, मानसिक संतुलनासाठी खेळाशिवाय पर्यायच नाही. शिक्षणाने मुलांची मानसिक, शारीरिक व बौद्धिक वाढ व्हायला खेळ हवाच.

खेळामुळे आपले स्नायू बळकट होतात,शरीरातील सर्व संस्थांचे कार्य सुरळीत चालते,दिवसभराचा मानसिक ताण कमी होऊन आपल्यामध्ये नवीन उत्साह येतो,तसेच आलेल्या परिस्थितीला सामोरे जायची,पराजय हसत स्वीकारण्याची व विजयाने उन्मत्त न होण्याची आपल्याला सवय लागते.

माझी खात्री आहे की आता तुम्ही 'वेळ मिळाला तर खेळ'म्हणण्याऐवजी 'खेळासाठी वेगळा वेळ' असे नक्कीच म्हणाल.

मला वाटते

मला वाटते कधीकधी व्हावे एक सुंदर परी!
रहावे अशा जगी,
जेथे शाळा पुस्तक नाही.
मला वाटते कधीकधी व्हावे एक कळी
वाढावे मोकळ्या रानी
गात रंगीत, सुंदर गाणी
मला वाटते कधी कधी व्हावे एक पाखरू
आणि उडावे भुरूभुरू
नाचावे वाऱ्यावर सुरूसुरू
पण असेही वाटे कधी मला
छान नाही का अशीच मी मुलगी!

कु. नेहा इंदूरकर, ६वी
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

बाळाची तक्रार

आई मुळी कधी खरं सांगतच नाही!
एकदा म्हणते 'अगदी वेडा!'
पुन्हा म्हणते 'बाळासारखा' शहाणा कोणी नाही!
खाऊ मागितला की म्हणते,''खादाड भारीबाई!''
जेवत नाही की म्हणते,''राजा जेवत कारे नाही!''
घरात गोंगाट केला की,''बाहेर कर मस्ती!''
बाहेर खेळत राहिला की,''भटकतोस रे किती?''
''पाटी घेऊन अ आ काढ,किती सांगू तुला!''
अभ्यास घे म्हटले की,''पडू दे जरा मला!''
खट्याळ साऱ्या मुलखाचा,आवडत नाही म्हणते
झोप आल्यावर पापे घेऊन लाड कशाला करते?

प्र.वै.लासुरे, ७वी ड

कामगार दिनाच्या निमित्ताने

राबणारे बाल कामगार

रामनाथ चव्हाण

राबणाऱ्या बाल कामगारांची संख्या आपल्या देशात मोठ्या प्रमाणात आहे.ज्या वयात मुलांची पावलं शाळेच्या दिशेनं पडायला हवीत; त्याच वयात शाळेचा रस्ता हरवलेली आणि समाज शिष्टाचारापासून दुरावलेली अल्पवयीन असंख्य मुलं-मुली आपलं बालपण विसरून, खेळण्या बागडण्याचं कोवळं वय मागे टाकून, केवळ दोन वेगच्या अन्नासाठी, रात्रन्दिवस वेगवेगळ्या छोट्या -मोठ्या व्यवसायात राबताना दिसतात. विशेषत: शहरातील छोटी-मोठी हॉटेल्स, दारूची दुकाने, घरांची बांधकामे, वीटभट्टया, पेट्रोलपंप, मोटारीची छोटी-मोठी गॅरेजेस्, वर्कशॉपस्, कारखाने आणि मंडई, अशा कितीतरी ठिकाणी लहान मुले काम करताना आढळतात.

वस्तुत: अशा बाल कामगारांच्या वयाच्या आणि शारीरिक क्षमतेच्या तुलनेनं त्यांना दिलेलं काम, हे त्यांच्या कुवतीच्या बाहेरचं असतं.मुलांना अशी अवजड काम करणं शक्यही नसतं, परंतु प्राप्त परिस्थितीमुळे त्यांचा नाईलाज झालेला असतो. कारण त्यांच्या दृष्टीने पोटाचा प्रश्न महत्त्वाचा असतो. असे प्रश्न सोडवता सोडवता त्यांचे बालसुलभ मन, केव्हा कोळपून, करपून जातं हे त्याचं त्यांनाही कळत नाही.

विशेषत: कौटुंबिक दारिद्र्य, सामाजिक



उपेक्षा, वाईट साथसंगत, उपासमार, अस्थिरता, कुटुंबातील कर्त्या माणसांची व्यसनाधीनता आणि भोवतालचे वातावरण. अशा प्रमुख कारणांमुळे, अल्पवयातच मुले-मुली व्यवसायाकडे वळतात आणि त्यातून मिळणाऱ्या अल्प पैशातून स्वत:च्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्नकरतात. काही वेळा कुटुंबाची जबाबदारीही सांभाळतात. अशा व्यवसायातून मिळणारा पैसा, रोजच्या रोज हातात खेळता राहिल्याने अधिकाधिक पैसा मिलविण्यासाठी ते धडपडतात. पुढे या चक्रातून ती बाहेर पडायला तयार होत नाहीत.किंबहुना भोवतालची आणि घरची परिस्थिती त्यांना त्यातून बाहेर पडूच देत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

राबणाऱ्या किंवा बाल कामगार मुलांचे प्रमाण हे दलित, मागासलेल्या व अल्पसंख्यांक समाजात अधिक आहे. अंगमेहनत करून उपजीविका करणाऱ्या किंवा कष्टकरी गरीब कुटुंबात अशा मुला-मुलींची संख्या मोठी आहे. ज्या कुटुंबात खाणारी तोंडे अधिक आणि कमविणारे थोडे अशा कुटुंबातल्या मुलांना, वेळच्या वेळी जेवण मिळत नाही, अंगभर वस्त्र मिळत नाही, हौस मौज करता येत नाही, आर्थिक दारिद्र्यामुळे आई किंवा वडील शाळेचा खर्च करू शकत नाहीत किंवा व्यवसायाच्या निमित्ताने पालकांची सतत भटकंती असल्याने स्थिर जीवन जगता येत नाही, अशा कुटुंबातली मुले-मुली अल्पवयातच छोट्या-मोठ्या व्यवसायात राबतात. काही वेळा, घरच्या परिस्थितीमुळे ती स्वत: व्यवसाय स्वीकारतात किंवा कुटुंबातली कर्ती माणसेच जाणून बुजून, हेतूत: मुलांना व्यवसाय अथवा नोकरी करायला लावतात. अशावेळी शिक्षणापेक्षा पोटाचा प्रश्न त्यांना अधिक महत्त्वाचा वाटतो. त्यांच्या दृष्टीने केवळ जगणे हेच मुख्य ध्येय असते.एवढेच नव्हे तर, मुलांनी घर-प्रपंचाला हातभार लावावा, कष्टाची सवय करून घ्यावी, स्वत:च्या गरजा स्वत: भागवाव्यात आणि स्वत:च्या पायावर उभे रहावे अशी अपेक्षा मुलांकडून केली जाते. पर्यायाने मुलांचे शाळेकडे दुर्लक्ष होते आणि पैसे मिळविण्याच्या उद्देशाने वाट्टेल त्या व्यवसायात अशी मुले अडकली जातात व कुटुंब, समाज, संस्कार, शिक्षण आणि स्वत:च्या वेगळ्या अस्तित्वापासून दूर जातात.

अल्पवयीन मुलांच्या भरकटलेल्या आयुष्याला जशी भोवतालची परिस्थिती जबाबदार आहे; कौटुंबिक दारिद्र्य जबाबदार आहे; तितक्याच प्रमाणात समाजही जबाबदार आहे. समाजातील छोटे-मोठे व्यावसायिक मुलांच्या वयाचा विचार नकरता त्यांना आपल्या व्यवसायासाठी रात्रंदिवस अल्पमोबदल्यात राबवून घेत असतात. कमी मोबदल्यात अधिक काम करून घेतात. आपल्या मर्जीप्रमाणे राबवतात. वेळ प्रसंगी वाम मार्गालाही लावतात. अशा मुलांच्या कामाच्या वेळा ठरलेल्या नसतात, वेळेची मर्यादाही नसते किंवा त्यांच्या भविष्याची जबाबदारीही स्वीकारलेली नसते. त्यांनी हवे तेवढे काम करून घ्यायचे आणि

मर्जीनुसार त्यांना मोबदला द्यायचा, एवढाच माफक व्यवहार केला जातो.

अशा बाल कामगारांची कामाचीठिकाणे निश्चित नसतात किंवा कामाचीही निश्चिती नसते, जोपर्यंत मालकांशी जमते तोपर्यंत काम करत रहायचे, नाही जमले तर अन्य ठिकाणी कामावर जायचे अशी भटकंती सतत चालू असते. मुलांना कामावर ठेवायचे किंवा हाकलून द्यायचे हे सर्वस्वीत्याव्यवसाय प्रमुखावरच अवलंबून असते. त्यामुळे असे बालकामगार, व्यवसायप्रमुखाच्या मर्जीत वागताना आढळतात. घरच्या दारिद्र्याला, उपासमारीला आणि उपेक्षेला कंटाळलेली मुले वेळप्रसंगी व्यवसायप्रमुखाचा अत्याचारही सहन करत असतात. पोटासाठी अन्यायाचे बळी ठरतात.

विशेषत: ज्या मुलांचे आई-वडील हयात नसतात किंवा वडील व्यसनाधिन असतात, घरची अवस्था हलाखीची असते व नातेवाईक आधार देत नाहीत, अशा अनाथ मुला-मुलींना, स्वत:चे पोट भरण्यासाठी नाईलाजाने छोट्या-मोठ्या व्यवसायाकडे वळण्याशिवाय पर्याय उरत नाही. अशा वेळी काही मुले व्यवसायात स्थिरावतात,परंतु अशा स्थिरावलेल्या मुलांची संख्या अत्यंत अल्प असते. बहुसंख्य लहान मुले-मुली, अस्थिर जीवनच जगत असतात. दोन वेळचे अन्न हेच त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असते.

देशात अनाथ व निराधार राबणाऱ्या मुलांची संख्या खूप आहे. दिवसभर काम करायचे, दुपारी हॉटेलात खायचे, रात्री

व्यवसायाचे ठिकाण बंद झाले की,कामाचा मोबदला घ्यायचा, रात्री पुन: हॉटेलात नाहीतर अन्य ठिकाणी खायचे, व्यवसायातील जोडीदार असतील तर नाटक सिनेमाला जायचे आणि जिथे आडोसा मिळेल अशा ठिकाणी झोपायचे, कधी उघड्यावर, कधी बांधकामाच्या रिकाम्या गाळ्यात किंवा फुटपाथवर, नाहीतर रेल्वे स्टेशनवर! हीच त्यांच्या निवाऱ्याची ठिकाणे प्रामुख्याने ठरलेली असतात.

अशा तऱ्हेने जगणारी असंख्य मुले कसेबसे पोट मरून जगत आहेत. काही असाध्य रोगाने पछाडलेली, काही व्यसनाधिन झालेली, तर काही वाम मार्गालाही लागलेली आढळतात. स्वतंत्र, स्वैराचारी, मुक्त जगणे, रोजच्या रोज मिळणारा पैसा, या वातावरणात ही पूर्णपणे गुरफटून गेलेली दिसतात.कमवणे आणि खाणे-पिणे एवढाच माफक उद्देश ठेवून

जगणाऱ्याअशाअनाथ, राबणाऱ्या, बेवारशी, मुलांची समस्या कठीण आहे. त्यांना योग्य मार्ग दाखवणारे, शिकवणारे व त्यांच्यावर योग्य संस्कार करणारे जग, हे त्यांच्यापासून कितीतरी दूर आहे. अशा परिस्थितीत वाढलेली मुले, अकाली प्रौढ होतात समाजापासून दुरावतात आणि त्यांच्याच विश्वात ती भरकटत जातात. अशा कष्टकरी लहान मुलांना योग्य दिशा कोण दाखवणार हा खरा प्रश्न आहे.

आपल्या देशात विशिष्ट वयाच्याआतील मुलांना कामावर ठेवणे कायद्याने गुन्हा ठरवलेला आहे. परंतु हा कायदा पाळताना फारसे कोणी आढळत नाही. स्वत:च्या फायद्यासाठी कायदा मोडून अल्पवयीन हजारो हातांना राबवून घेणाऱ्यांचे प्रमाण खूप मोठेआहे. हे थांबायला हवे.ही जबाबदारी केवळ कायद्याची किंवा शासनाचीच नव्हे तर, सुसंस्कृत म्हणवणाऱ्या जाणकार स्थिर समाजाचीही आहे. तत्तपूर्वी बाल कामगार निर्मितीच्या कारणांचा प्रामाणिक शोध घेऊन त्यावर तितक्याच प्रामाणिकपणे उपाय करण्याची आज गरज आहे.

आपल्या भागातील अशा काही बाल कामगारांना आवर्जून भेटाल का? प्रारंभी ती कदाचित तुम्हाला जवळ करणार नाहीत. सहजासहजी तुमच्याशी बोलायला तयार होणार नाहीत. पण चिकाटीने, त्यांच्याबद्दलच्या प्रेमापोटी तुम्ही त्यांच्याशी/ तिच्याशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना विलक्षण आनंद होईल. त्यांच्या या रुक्ष अन् कष्टप्रद आयुष्यात थोडीशी हिरवळ तुमच्या आपुलकीतून निर्माण झाली तर बाल कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी तुम्ही तुमच्या परीने प्रयत्न केले असे नक्कीच होईल.

असे हे गणित ... असे हे गणिती

ऑयलर आणि कोनिग्सबर्गचे सात पूल

डॉ. जयंत नारळीकर

लिओनार्ड ऑयलर (१९०७-१७८३) हा युरोपातला एक असामान्य गणिती. न्यूटनच्या काळात गणिताचा उत्कर्ष सुरू झाला आणि हा विषय पुढल्या दोन शतकात युरोपात बहरला. त्यामागे ज्या गणितज्ज्ञांनी विशेष हातभार लावला त्यात ऑयलरचे नाव घेतले जाते. अर्थात आपल्या जीवनकाळात ऑयलरने बहुमोल संशोधन केले आणि अनेक कूट प्रश्न सोडवले. त्यातला एक प्रसिद्ध प्रश्न कोनिग्सबर्ग नावाच्या जर्मनीतील एका राज्यात उद्‌भवला.

कोनिग्सबर्ग मधून एक नदी वहात होती. ज्यात दोन बेटे A, B होती. (पुढील पानावरील आकृती १पाहा) नदीच्या किनाऱ्यांना बेटांशी व बेटांना एकमेकांशी जोडणारे ७ पूल होते. एकदा कोणीतरी प्रश्न काढला...अशा तऱ्हेने चालून दाखवा की ह्या सातपैकी सातही पुलांवरून एकदा आणि एकदाच जायचे.

गावकऱ्यांना ते जमले नाही. (तुम्ही प्रयत्न करून पाहा!) पण ही एक अशक्य बाब आहे का? का गावकऱ्यांनी पुरेसे डोके न वापरल्यामुळे त्यांना उत्तर सापडले नाही. जरी हा आकडेमोडीचा प्रकार नसला तरी एक गणितीच उत्तर सांगू शकेल अशा विचाराने हा प्रश्न युरोपातल्या गणिती मंडळीकडे गेला. शेवटी ऑयलरने



तो सोडवला.इतकेच नव्हे तर त्याने एक नियम सिद्ध केला जो वापरून अशा तऱ्हेचा कुठलाही प्रश्न सोडवता येईल!

ऑयलरचा नियम समजून घ्यायला आपण पुलांचे चित्र वेगळ्याप्रकारे काढू. इथे नदी-किनारे आपण C आणि D ह्या बिंदूंनी तर बेटे A आणि B ह्या बिंदूंनी दर्शवले आहेत. सात पूल म्हणजे ह्या बिंदूंना जोडणाऱ्या सात रेषा, तर गावकऱ्यांचा प्रश्न ह्या आकृतीच्या संदर्भात असा. सोबतची आकृती अशा तऱ्हेने गिरवा की प्रत्येक रेषेवरून एकदाच जायचे. हे शक्य आहे का नाही ते ठरवायला ऑयलरचा नियम असा.

अशा आकृतीत काही शीर्ष बिंदू (A,B,C,D) असतात.ज्यांना रेषांनी



जोडलेले असते (1,2,3,4,5,6,7). ज्या बिंदूतून समसंख्येने रेषा निघतात त्यांना सम-बिंदू म्हणू, तर ज्यातून विषम संख्येने रेषा निघतात त्यांना विषम बिंदू! इथे A(3), B(5), C(3), D(3) सर्वच विषम बिंदू आहेत...सम-बिंदू एकही नाही. **ऑयलरचा नियम सांगतो की जर आकृतीत विषम बिंदूंची संख्या दोनहून जास्त असेल तर ती गिरवता येणार नाही.** तेव्हा कोनिग्सबर्गच्या सात पुलांवरून एकदा आणि एकदाच जाणे शक्य नाही.

तुम्ही वेगवेगळ्या आकृत्या काढून गिरवून पाहा ऑयलरचा नियम त्यांना कसा लागू होतो ते!

जरा डोके चालवा

८ नाणी आहेत. १ वजन काटा आहे.ह्या ८नाण्यांपैकी१नाणं कमी वजनाचं आहे. बाकी७ नाणी समान वजनाची आहेत. ही आठही नाणी दिसायला सारखीच आहेत.हातात घेऊन वजन करायचा प्रयत्न केला तरी हाताला काहीच जाणवत नाही.सर्व एकाच आकाराची आहेत.२ वेळाच वजन करून कमी वजनाचं नाणं कुठलं आहे ते ओळखा.

समीर ताटके

८ वी, ज्ञा.प्र.प्र., पुणे

दमण्यातला आनंद.....

अनुभवांची साखळी

५०० कि.मी.ची सायकल सहल

निलेश झेंडे,संदीप घुले

संध्याकाळी ७.००च्या सुमारास आम्ही रस्त्याच्या कडेला बसून इतर सर्वांची वाट पहात होतो. इतक्यात निरोप आला की दोघांच्या सायकली पंक्चर आहेत. म्हणजे अजून अर्धा तास तरी थांबणे आवश्यक-गरजेचे होते. पुढच्या ६ कि.मी.चा रस्ता फारच कच्चा, दगड धोंड्याचा असल्याचे येणारे-जाणारेसांगत होते.मागचे सर्व येईपर्यंत तेथेच उघड्यावर पडलेल्या ऊसतोडी कामगारांची पालं न्याहाळत होतो.पालातल्या ४-६ मुलांशी गप्पा सुरू जाल्या. जळगाव-आंबेजोगाई-शेवगाव अशा ठिकठिकाणाहून ही सर्व कुटुंबे तेथे कामासाठी-पोटापाण्या-साठी आली होती. ४ वर्षाच्या लहान मुला-मुलीं पासून६०-६५ वर्षांच्या वृद्धांपर्यंत प्रत्येक जण कोणत्यानाकोणत्या प्रकारचे काम करून पैसे मिळवत होता. मुलं प्रारंभी भीत भीत पण नंतर मोकळेपणाने त्यांच्या कथा अन् व्यथा मांडत होती. समाजातल्या एका वेगळ्याच गटाचं आम्हाला फार जवळून दर्शन घडलं.

८ च्या सुमारास सर्वजण एकत्र जमलो. एव्हाना खूप अंधारून आलं होतं. रस्ता कळण्यासाठी बहुतेकांनी आपल्या जवळील विजेच्या(बॅटऱ्या)काढल्या. एका हातात सायकलचे हँडल व दुसऱ्या हतात बॅटरी धरून आम्ही सर्वजण चाललो होतो. हळूहळू रस्ताही त्याचे उग्र स्वरूपआम्हाला दाखवत होता. खरं तर ६-७ कि.मी. म्हणजे आता आम्हाला काहीच वाटत नव्हतं.पण दिवसभर उन्हातून झालेला प्रवास त्यामुळे

बऱ्यापैकी दमणे झाले होते.

ज्या रस्त्याने जात होतो ती दगड-धोंड्यांची वाट होती. एका पाठोपाठ एक अशा तीन सायकली पंक्चर झाल्या.रात्री पंक्चर काढण्यात वेळ जाऊ नये म्हणून सर्वजण चालत निघालो. मध्ये पाण्याचे दोन ओढे ओलांडले, अन् सुमारे दीड तास चालत अखेर पिंपळनेर गाठले. रात्रीचे ९.३० वाजले होते. शेवटचे २ कि.मी. डांबरी रस्ता होता. घाम पुसत आणि गावातल्या निरनिराळ्या लोकांकडे घरामधले पाणी पीत आम्ही राळेगण-सिद्धीकडे कूच केले. गावात पोहोचायला १०.१५ झाले. आमच्या सुदैवाने आण्णा हजारे गावातच होते.

त्यांनी ताबडतोब गावकऱ्यांना बोलावून आमच्या जेवणाची व्यवस्था करायला सांगितली. त्या दिवशी गावाची जत्रा होती. रात्री ११.०० वाजता घराघरातून पुरणपोळी अन् गुळवणीचे जेवण जेवताना सगळ्यांना कंठ फुटला अन् रात्रीच्या दोन तासाच्या प्रवासातल्या गमती जमती-पडणे, 'धड' पडणे इ. सर्व आठवणी एकमेकांना सांगण्यात सर्वजण बुडून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी सायकलींची स्थिती तपासताना आणखी४ सायकली पंक्चर असल्याचे लक्षात आले. तेव्हा आम्ही एक छोटेखानी दुकानच तिथे थाटलं आणि मोठ्या सफाईने एकामागून एक पंक्चर्स दुरुस्त होत गेली.

असे एक-दोन नाही, गमती जमतीचे कितीतरी अनुभव, विविध लोकांच्या अन् संस्थांच्या भेटीगाठी, शारीरिक ताकद अन् प्रसंगी मानसिक ताकदही पणालालावणारा हा प्रवास आम्हा सर्वांना आयुष्यभर लक्षात राहील असा विलक्षण अनुभव देऊन गेला.

१६ एप्रिल संध्याकाळी सर्वजण प्रबोधिनीत एकत्र जमली. नाशिक, पनवेल, चाळीसगाव, लातूर, सातारा, पुणे, हडपसर, मांजरी, पिसर्वे अशा विविध ठिकाणांहून आम्ही २१ जण आलो होतो.परस्पर ओळखी झाल्या. दि. १७ची सकाळ सरावासाठी वापरली. १६ कि.मी. वर असलेल्या NDA पर्यंत आम्ही जाऊन आलो. येताना ज्ञान प्रबोधिनीचे संजीवन रुग्णालय पाहिले. जेवण व थोडी विश्रांती घेऊन दुपारी ३.०० वाजता प्रत्यक्ष सहलीस प्रारंभ झाला. सुरुवातीला बालेवाडी येथील क्रीडासंकूल बघायचे होते. पुणे विद्यापीठाजवळ-सलामी म्हणून की काय एकाची सायकल बर्स्ट झाली आणि सहलीतल्या अडथळ्यांना प्रारंभ झाला. बालेवाडीतील विविध खेळांची क्रीडांगणे बघून रात्री ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी येथील शाळेत मुक्कामास गेलो. वाट चुकण्याचे काही प्रकार झाले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे १८ तारखेला सकाळी देहूला तुकाराम महाराजांचे दर्शन घेऊन चाकणमार्गे राजगुरूनगरला दु.२.०० वाजता पोहोचलो. एव्हाना उन्हाची बऱ्यापैकी सवय झाली होती. प्रबोधिनीच्या जवळच्या परिचयाचे श्री. कुलकर्णी व

श्री.पाटील यांनी सर्वांची जेवणाची व्यवस्था केली होती. विश्रांती घेऊन सायं.५.०० वाजता आम्ही पेठच्या दिशेने निघालो. वाटेत छोटा घाट होता. घाटाच्या मध्यावर पोहोचल्यावर एका बाजूला इंदिरा पाझर तलाव दिसला.तेथे उतरून अंघोळी केल्या. काहीजण पोहले. दिवसभराचा सगळा थकवा निघून गेला. संध्या. ७.००च्या सुमारास पेठला पोहोचलो. रात्री ढाब्यावर जेवण करून सर्वजण झोपलो.

रोजच्या दिवसाची सुरुवात उपासनेने होत असे. प्रारंभी नियम म्हणून आम्ही सर्व उपासनेला बसत असू. कालांतराने त्याचा अर्थ जसजसा समजत गेला, तसतशी त्यातील एकाग्रता वाढत गेली. दिवसाचा प्रारंभ उत्साहाने व्हायचा. आपण सर्वजण एकत्र आहोत ही भावना एका सुरात म्हटलेल्या ओंकारातून जाणवायची. दिवसभराच्या पळापळीत जागेपणीचीही स्वस्थता वेगळाच ठसा उमटवायची. त्यातही महेन्द्र सरांनी सांगितलेले "The [prayer does not change the things for you but you for the things" हे वाक्य खूप भावले.आलेल्या कोणत्याही संकटांना सामोरे जाण्यासाठी हळूहळू मन तयार होत गेले.

१९ तारखेला सकाळी मंचर येते चहा घेऊन नारायणगाव येथे ग्रामीण शेळी सुधार संस्थेस भेट दिली.तेथील सानेन जातीच्या शेळ्यांमुळे दूध उत्पादनात झालेल्या वाढीसंबंधी माहिती मिळाली. श्री. श्रीकांत सबनीस यांनी १९७८ पासून या कामासाठी स्वत:ला कसे वाहून घेतले, त्यात कशा अडचणी आल्या हे आम्हाला सांगितले. Hard work च्या बरोबरच brain work ची ही जोड असायला हवी असे त्यांनी आग्रहाने मांडले. नाष्टा करून तेथून आम्ही आर्वी येथील सॅटेलाइट रिसिव्हिंग सेंटर बघायला गेलो. त्याची परवानगी आधीच मिळवली होती. श्री. वाघमारे या सहायक अभियंत्यांनी आम्हाला २ तास खूप सुरेख माहिती दिली.फोन, टी.व्ही. साठी जगाच्या कानाकोपऱ्यातून विविध प्रकारचे सिग्नल

अहोरात्र कसे मिळविले जातात व पाठविले जातात याची खूप सोप्या शब्दांमध्ये त्यांनी माहिती सांगितली.जेवण करून आम्ही जुन्नरला गेलो.रस्त्यात दोन सायकलींची अनपेक्षित धडक होऊन एकाच्या सायकलचे ५ स्पोक्स् तुटले,चाक आऊट झाले,मग ट्रकमधून ती सायकल जुन्नरला आणली व तेथे त्याचे आउट काढून घेतले.

रात्री शिवनेरीवर जायचा बेत रद्द करून जुन्नरमध्येच मुक्काम केला.१९ला सकाळी लवकर उठून साखळी वाटेने आम्ही शिवनेरी चढलो.शिवजन्मस्थानी केलेली उपासनाही विशेष लक्षात राहिली. गडावरील दगडी टाक्यांमधील थंडगार पाणी पिऊन लगेचच आम्ही खाली उतरलो.सायकली घेऊन आम्ही लण्याद्री गाठले.लेण्याद्री हे अष्टविनायकांपैकी एक

पायऱ्या चढून डोंगरातल्या गणपतींचे दर्शन घेतले.काहींनी उत्स्फूर्तपणे अथर्वशीर्ष म्हटले.एव्हाना दुपारचे १२.३० वाजले होते.५.००पर्यंत खोडदला पोहोचायचे होते.रस्त्यात ओझर येथील गणपतीचे दर्शन घेतले.नदीवर आंघोळी केल्या.वडा-सांबार,पाव,चहा असे जेवण केले आणि पावसाच्या सरी अंगावर घेत संध्याकाळी ७.०० वाजता खोडद गाठले.जगातली सर्वात मोठी रेडिओ दुर्बीण तयार करण्याचे काम तेथे चालू आहे.तेथील एक संशोधक श्री.उमेश पुराणिक यांनी दोन तास खूप छान माहिती सांगितली योगायोगाची अन् आमच्या सुदैवाची गोष्ट म्हणजे या सर्व प्रकल्पाचे संचालक व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. गोविंदस्वरुप त्यावेळी तेथेच होते.तेही अर्धा तास आमच्याशी हिंदीतून बोलले.

रात्री ९.००वाजता आम्ही तेथून निघून सुलनतानपूर या गावात पोहोचलो.खरे तर गावात जेवणाच्या व्यवस्थेसंबंधी आधी सांगून ठेवले होते.पण पत्र न पोहोचल्याने विशेष तयारी केली गेली नव्हती.गावात एका ठिकाणी देवाच्या उत्सवाची जेवणे चालू होती.तेथे शिरा व उसळ असे मोठे गमतीशीर जेवण आम्ही घेतले अन् शाळेच्या प्रशस्त आवारात आम्ही सर्व झोपी गेलो.

२० तारखेला सकाळी गावाने आम्हा सर्वांना चहा-पाव दिला.सरपंच व इतर प्रतिष्ठित मंडळींनी आमची आस्थेने

विचारपूस केली.नंतर आम्ही तेथून पुढे निघालो.या सर्व प्रवासात आम्हाला मिळाला भरपूर ऊस! त्यामुळे सायकल प्रवासातला निम्मा वेळ तरी आम्ही ऊस खात खात सायकली मारत होतो.आजचा सर्व प्रवास कॅनॉलच्या कडेकडेने कच्च्या वाटेतून होता.मध्येच एक शॉर्ट कट म्हणून आम्ही चक्क डोंगरातून पायवाटेने आमची सायकल दौडवली. २कि.मी.चा पल्ला त्यामुळे वाचला. दुपारी निघोज येथे नदीत आपोआप तयार झालेली रांजणकुंडं बघायला गेलो. निसर्गाचा एक अप्रतिम चमत्कार बघायला मिळाला. नदीमध्ये लांबपर्यंत रांजणासारखे दगडाचे आकार जणू कोणी कोरून तयार करावेत असे दिसत होते. भर उन्हातही आम्ही मोठ्या उत्सुकतेने सर्व पाहात होतो. जेवण करून जवळामार्गे

राळेगण सिद्धीस रात्री १० वाजता पोहोचलो.२१ तारखेला दिवसभर राळेगणलाच होतो. मा.आण्णा हजारे यांचेबरोबर तास-दीड तासाची बैठक झाली. स्वत:च्या आयुष्याचा सगळा प्रवास अत्यंत साधेपणाने पण प्रेरणादायी रीतीने आम्हा सर्वांसमोर त्यांनी मांडला. १०वी नंतर आयुष्यात कायकरायचं याचा निर्णय घेताना, कशाकशाचा विचार कराल, सुख कशात आहे, सेवेतला आनंद किती मोठा असतो या सर्वांबद्दल ते बोलले. त्यांचे बोलणे मनात खोलवर रुजले.

राळेगण सिद्धीचे विविध प्रकल्प पाहून विश्रांती घेऊन आम्ही संध्याकाळी ५.०० वाजता शिरुरच्या दिशेने निघालो. संध्याकाळी ५ ते रात्री ९.३० हा साडेचार तासांचा प्रवास आमच्या संपूर्ण सायकल सहलीतला

अत्यंत सुखद प्रवास ठरला.गुळगुळीत अशा राष्ट्रीय महामार्गावरून सायकल चालवताना ५० कि.मी.चे अंतर कसे पार झाले हे कळले सुद्धा नाही.वाटेत रांजगणगावला गणपतीचे दर्शन घेण्यासाठी थोडा वेळ थांबलो तेवढीच काय ती विश्रांती.सगळेच आम्ही तळेगाव-ढमढेरेला मुक्कामी आलो. ज्ञान प्रबोधिनीच्या शाळेत शिकत असलेल्या विशाल दौंडकरच्या घरी जेवणाची छान व्यवस्था केली होती.तेथील आदरातिथ्य व आग्रह आम्हाला घरगुती वातावरणात घेऊन गेला.

२२ तारखेला सकाळी यवतकडे जाण्यासाठी निघालो.बागायती शेतीकडून आता आम्ही कोरडवाहू शेतीकडे प्रवास करत होतो.पाण्याचे प्रश्न,दुष्काळ याची हळूहळू जाणीव व्हायला लागली.एका बाजूला उसाचे मळे तर त्याच्या शेजारीच पिण्याच्या पाण्यासाठी हंड्यांची रांग असे विसंगत दृष्य पहायला मिळाले. दोन दिवसांपूर्वीच पाटातून खळखळा वाहणारे पाणी आम्ही पाहिले होते.१००कि.मी.च्या टप्प्यांमध्ये इतकी तफावत कशी असा प्रश्न मनात आला.खरं तर अंघोळीसाठी नदीवर उतरणार होतो.पण पाण्याची अवकळा पाहून न उतरलेलेच बरे असे सर्वांनी ठरवले. राहू येथे मनसोक्तपणे दीड तास लगोरी खेळलो,मजा आली.जेवण करून संध्याकाळपर्यंत यवत गाठले.सगळाच रस्ता फुफाट्याचा,धुळीचा होता.आमच्या सायकली कशा काय टिकल्या याचे राहून राहून आम्हाला आश्चर्य वाटले.कारण इतका खाचखळग्यांचा रस्ता असूनही एकाच्याही सायकलने कुरकूर केली नव्हती.त्यातच आमच्यातल्या एकाला उलटीचा त्रास सुरू झाला.दिवसभर केवळ लिंबू सरबत, इलेक्ट्रॉलवर राहूनही मोठ्या जिद्दीने तो आमच्या बरोबर आला.

संध्याकाळी आम्ही उशिरा भुलेश्वर मंदिरात पोहोचलो.मंदीर टेकडीवर आहे तेथपर्यंतचा छोटा घाट अन् चढ खूपच दमवून गेला.पण टेकडीवर सुरेख गार वारा व देवळाच्या आतील व बाहेरील कोरीव काम शरीर अन् मन् दोघांनाही सुखावून गेले.फारच अप्रतिम नक्षी पाहून पूर्वजां-बद्दलचा आदर अन् अभिमान कैक पटीने वाढला. मुघलांनी केलेल्या तोडफोडीचाही तितकाच विलक्षण राग आला.तेथेच मुक्काम करण्याची तीव्र इच्छा होत होती पण पाण्याचा प्रश्न होता.अखेर अंधारात आम्ही दुसऱ्या बाजूने घाट उतरलो.पंक्चरने येथेही आमची साथ सोडली नाही.पुढचा रस्ता कच्चा होता.थोडेसे चिडत,रागवत रात्री ११ वाजता आम्ही पिसर्वे या गावी पोहोचलो. या गावातील तरुण मंडळी आमच्या स्वागतासाठी थांबलीच होती.सयाजी कोलते व उमा कोलते व अन्य तरुणांनी ताबडतोब गरमगरम भाकरी अन् पिठलं भात करून आणलं.अर्धवट झोपेतही आम्ही त्या रुचकर आणि प्रेमाने वाढलेल्या जेवणाचा आस्वाद घेत होते.नंतरची गाढ झोप दीर्घकाळ लक्षात राहील अशीच

(पान ३९ वर पुढे चालू)

होती.

मित्रांनो,

घारापुरी येथली प्रसिद्ध लेणी तुम्हाला माहिती आहेत ना?तिथला प्रसंग आहे बरं का!

तिथं एका मूर्तीच्या डावीकडं एक पर्यटक उभा होता.तो उद्‌गारला,''ही मूर्ती माझ्याकडं पाहून हसतेय.''एवढ्यात त्या मूर्तीच्या उजवीकडील पर्यटकही उद्‌गारला,''ही मूर्ती रडतेय.''पहिल्या पर्यटकानं चमकून दुसऱ्याकडं पाहिलं आणि तो रागानं म्हणाला,''खोटं बोलू नकोस,ही मूर्ती हसतेय.''त्यावर दुसरा अधिक आवाज चढवून म्हणाला,''तूच खोटारडा आहेस.ही मूर्ती रडतेय.''

हितगुज

सुहास महाजनी

आणि त्यानं तिथं उभ्या असलेल्या एका अन्य पर्यटकाला बोलावलं आणि म्हणाला,''पाहा,माझंच म्हणणं खरं आहे की नाही? ही मूर्ती आपल्याकडं पाहून हसतेय की नाही?''तो नवीन पर्यटक म्हणाला,''होय ती आपल्याकडं पाहून हसतेय.''ते ऐकून त्या दुसऱ्या पर्यटकानंही



गर्दीतील आणखी एका पर्यटकाला आपल्याकडे ओढलं आणि म्हणाला, ''पाहा, ही मूर्ती रडतेय की नाही?''त्या पर्यटकानेही त्याला होकार भरला. आणि अल्पावधीतच,''तुम्ही मूर्ख आहात! तुम्हीच खोटारडे आहात!''अशा आरोळ्या त्या मूर्तीच्या दोन्ही अंगांकडून यायला लागल्या.तिथंही डावे आणि उजवे असे दोन तट पडले. आणि हा हा म्हणता दोन्ही पक्ष हमरी-तुमरीवर आले. अस्तान्या सावरून एकमेकांकडे धावू लागले. रणक्षेत्राचं स्वरूप आलं. एवढ्यात तिथला मार्गदर्शक तिथं धावत आला आणि ओरडून म्हणाला, ''थांबा, मागे व्हा! तुम्ही दोघेही बरोबर आहात. पण मूर्ख आहात!'' आणि त्या मार्गदर्शकानं उजवीकडील पर्यटकांना मूर्तीच्या डावीकडं आणि डावी कडील पर्यटकांना मूर्तीच्या उजवीकडं आणून उभं केलं आणि तो म्हणाला,''हं, आता सांगा'' दोन्ही पक्षाचे-डावे आणि उजवे-अगदी ओशाळून गेले. कारण जागा बदलल्यानंतर त्यांच्या लक्षात आलं की डावीकडून पाहिलं तर मूर्ती हसतेय आणि उजवीकडून पाहिलं तर ती रडतेय.

मित्रांनो, त्या दोघा पर्यटकांचं झालं, तसंच वागणं व्यवहारात आपलं होतं ना? एखाद्या घटनेविषयीचे आपले मत, आपलाच दृष्टिकोन बरोबर आहे असे आपण मानतो आणि आपल्यापेक्षा वेगळे मत-वेगळा दृष्टिकोन चुकीचा मानतो. एखाद्या वस्तुस्थितीचं आकलन, अन्य प्रकारे होऊ शकतं हे आपल्याला मान्यच नसतं. आणि मग त्या व्यक्तींची गणना, आपण चक्क शत्रूपक्षात करतो. आपल्या मतापेक्षा एखादं मत, एखादा विचार वेगळा आहे या कारणानं, बलानं, बलात्कारानं तो विचार आपण दडपू पाहतो.एवढंच नाही, तर वेगळा विचार मांडणाऱ्या व्यक्तीच्या जीवावरही उठतो!

भूकंप, महापूर अशा नैसर्गिक आपत्तींमध्ये आतापर्यंत जेवढा नरसंहार झाला, त्यापेक्षा कितीतरी अधिक नरसंहार 'माझं तेवढं खरं, नव्हे-तेवढंच खरं', या दुराग्रहामुळे झाला आहे.

याउलट तत्त्वज्ञ रुसो त्याच्या मित्राला म्हणतो, 'मित्रा, तुझा विचार चुकीचा आहे असं मला वाटतं. पण तो विचार मांडण्याचा तुझा अधिकार अबाधित रहावा यासाठी मी प्राणही देण्यास सिद्ध आहे.'

सूर्य पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकताना प्रत्यक्ष दिसतो खरा, पण सूर्य स्थिर असून पृथ्वीच स्वत:भोवती फिरते हा विचार काय, किंवा माणसाचा पूर्वज माकड आहे. हा विचार काय-रूढ विचारापेक्षा तो वेगळाच, नवीनच होता.पण कालांतराने तो सिद्ध झाला. खरा ठरला.

तेव्हा कोणत्याही क्षेत्रातल्या वेगळ्या, नवीन विचारांचं आपण स्वागतच करायला हवं. नाही का ? वैचारिक मतभेदाला म्हणा हवं तर, आपण प्रोत्साहन द्यायला हवं.

हत्तीच्या एकेका अवयवाला स्पर्श करून, तो अवयव म्हणजेच सगळा

हत्ती असं मानणाऱ्या आणि आपापसात हत्तीच्या स्वरूपाविषयी भांडणाऱ्या सात आंधळ्यांची कथा तुम्हाला माहीत आहे ना? त्या आंधळ्यांसारखीच आपली अवस्था होते काही वेळा.

एखाद्या वस्तुस्थितीचं आपल्याला जे दर्शन झालं, तेच खरं या आपल्या अहंकारापायी, दुराग्रहापायी आपल्याला वस्तुस्थितीचं, एकांगी, अपुरं दर्शन होतं. सम्यक् दर्शन होत नाही.

तेव्हा मित्रांनो, विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणे ''कुणालाही धक्का लावू नका.
कुणाचाही भाव भग्न करू नका.
कुणाचाही दृष्टिकोन चुकीचा म्हणू नका.
तोडमोड करू नका.''

एका वस्तुस्थितीविषयी, आपल्या मर्यादेत खरी असणारी, अनेक सत्य विधाने करता येणं शक्य आहे. म्हणजेच, एका वस्तुचं आपल्याला जे दर्शन झालं, तितकंच दुसऱ्या व्यक्तीला त्या वस्तुचं झालेलं वेगळं दर्शनही, तितकंच सत्य असणं शक्य आहे. मित्रांनो, हा विचार तुम्हाला पटतो का? आणि पटत असेल, तर व्यवहारात, दैनंदिन जीवनात, तो उतरावयाला हवा. मात्र त्यासाठी लागेल, मनाचे स्वाभाविक औदार्य, निरहंकारी वृत्ती आणि अर्थातच धैर्य.

'छात्र प्रबोधनच्या' सुजाण विद्यार्थ्यांनो....

कोण सांगतं पाखरांना ....
कुठलं गांव? कुठलं शहर?
कोण सांगतं पाखरांना ....
कुठल्या शेतात आलाय बहर?
कोण सांगतं पाखरांना ....
वळा, दिशा मिटल्या आहेत?
कोण सांगतं पाखरांना ....
कुठे कोणाची घरटी आहेत?
कोण सांगतं पाखरांना ....
हे वाईट ... हे बरं ...
माणसासारख्या माणसाला का,
शिकवावं लागतं हे सारं?

मुलांनो, तुम्हाला तर मार्गदर्शनासाठी गुरुजी आहेत.पालक आहेत ... एकमेकांशी सुसंवाद करीत पुढे जायचंय! आपला मार्ग स्वयंप्रेरणेने शोधा ... मार्गदर्शक आहेतच! प्रगतीसाठी, विकासासाठी सदैव जागृत रहा ... मनात प्रश्न ऊठू द्या ... त्यांची उत्तरे शोधा! झेप घ्या! तुमच्या पंखांसाठी खूप मोकळं आकाश आहे.

–सौ.विजया जहागीरदार
नंदुरबार, जि. धुळे

का ? व कसे ?

१) डोळे चोळले व उघडलेअसता आपणास समोर विविध आकृत्या का दिसतात?

उत्तर : डोक्यावर कशाचाही फटका बसला तर डोळ्यासमोर काजवे चमकणे, हा अनुभव आपल्याला परिचित आहे. आपण

डोळे मिटून थोडा दाब देऊन चोळले तरी अशा प्रकारचा अनुभव आपणास येतो. डोळ्यासमोर प्रकाशाचे झोत क्षणात उत्पन्न होऊन नाहीसे झाल्याचा भास होतो. निळ्या, हिरव्या, पिवळ्या, नारिंगी सौम्य रंगांचे हे झोत असतात. डोळ्यावरचा दाब आणखी वाढला तर समोर विचित्र आकृत्या व चमकते ठिपके दिसतात.

वस्तूपासून परावर्तित होणाऱ्या प्रकाशामुळे आपल्याला वस्तू दिसतात. हा प्रकाश जेव्हा नेत्रपटलावर पडतो तेव्हा मेंदू त्या वस्तूची प्रतिमा ओळखतो. डोक्यावर आघात झाला अथवा डोळे चोळले तर नेत्रपटलाचे स्नायू उत्तेजित होतात व मज्जातंतूही क्षणभर उद्दिपित होतात. या अंतर्गत मज्जातंतू उद्दिपनामुळे मेंदुला विविध प्रकारच्या आकृत्या व प्रकाशझोत जाणवतात व आपण त्यांचा अनुभव घेतो.

२) आपण उंच ठिकाणावरून पडलो असता आपणास इजा होते परंतु मांजरासारख्या प्राण्यांना इजा होत नाही. असे का?

उत्तर : मांजर हे मनुष्याच्या तुलनेने लहान व वजनास हलके असते. कमी वजनामुळे मांजर जमिनीवर पडताना त्याचा जमिनीवर सौम्य आघात होतो व त्यामुळे क्रिया प्रतिक्रिया या नियमानुसार कमी प्रमाणात त्यास दुखापत होते. मांजर उंचावरून पडताना स्वत:च्या भोवती फिरू शकते. शरीर वळवू शकते व बरोबर चार पायांवर उभे राहते. तसेच मांजराचे सांधे लवचिक असतात.

त्यामुळे जमिनीवर ते सहजपणे उभे राहते. मांजराच्या पावलांना तळव्याला मऊ गादीसारखा भाग असतो. त्यामुळे आघाताची तीव्रता कमी होते व दुखापत होत नाही. याउलट माणसाचे शरीर हे लहानमोठ्या हाडांचा सांगाडा असतो त्यामुळे त्याचा जमिनीवर आघातही तीव्र स्वरुपाचा होतो व दुखापत होते.

(पान ३४ वरून पुढे चालू)

सकाळी पुन्हा पंक्चर्स काढण्यासाठी दुकान थाटण्यात आले. यावेळी एका सायकलने तर विक्रमच केला. त्या सायकलमध्ये दहा पंक्चर्स निघाली.

सर्व आवरून आम्ही पुढच्या प्रवासात निघाली. सासवड येथील कस्तुरबा ट्रस्टच्या आश्रमात पोहोचायला आम्हाला दुपारचा एक वाजला. तेथील अनाथा- श्रमासंबंधी व कामासंबंधी माहिती घेतली, जेवण केले. तेथील मुलांबरोबर थोडेसे खेळलो. नळा-खाली आंघोळी केल्या अन् पुरंदराकडे कूच केले. पायथ्याशी पोहोचायला सहा वाजले. लोकांनी सांगितले, रात्री मुक्कामास वर जाऊ नका, पण महेन्द्र सरांनी वरच मुक्काम करायचे ठरवले. संधी प्रकाशात आम्ही सर्वजण गड चढलो. गिर्यारोहणाचा अनुभव मिळाला. रात्री तेथील सैनिकांची विनवणी करून मुक्कामाची परवानगी मिळवली. पुरंदरचा इतिहास ऐकून जेवण करून सर्व झोपलो. वाघाच्या भीतीने काहींना रात्री २-३ वेळा जागही आली. विविध प्रकारच्या आवाजांचा संबंध प्रत्येक जण वाघाशीच नेऊन भिडवत होता. सकाळी त्याबाबतचे अंदाज, तर्क करण्यात सर्वजण रमले होते.

२५ ला सकाळी पुरंदरच्या बाले किल्ल्यातील केदारेश्वराच्या मंदिरासमोर उपासना केली. आम्ही तर काही जण वज्रगडही बघून आलो तर काही ढेपाळलेले पुरंदर अजिबात न बघताच खाली उतरले. कापूरहोळमार्गे खेडशिवापूरला पोहोचायला

पाचशे किलोमीटरची सायकल सहल

आम्हाला संध्याकाळचे ५ वाजले. जेवण करून तेथील ज्ञान प्रबोधिनीच्या ग्रामविकसन कार्याची माहिती घेतली.

श्रीरामनगरमधील एक तरुण कार्यकर्ते श्री.रवी बांडे यांनी सर्वांसाठी कलिंगडे आणली होती. त्यांचा आस्वाद घेत रात्री दहा वाजता ससेवाडी गावात पोहोचलो.

पुण्याहून ज्ञान प्रबोधिनीचे काही विद्यार्थी, युवक कार्यकर्ते, ज्ञान प्रबोधिनीच्या ग्रामीण प्रज्ञा प्रकल्पाचे व गांधी वस्तीच्या शिबिरातील मुले व ससेवाडीतील ग्रामस्थ असे ५०-६० जण तेथे एकत्र जमले होते. खूप उशीर झाल्याने जेवणाचा कार्यक्रम फक्त एकत्र झाला. अनुभव कथन होऊ शकले नाही.

२६ला सकाळी ससेवाडी येथील ज्ञान प्रबोधिनीद्वारा चाललेली पाणलोट क्षेत्र विकासाची विविध कामे, पाझर तलावाची कामे गावातले तरुण कार्यकर्ते रोहिदास वाडकर यांनी दाखविली व एकूण ७०लाख रुपयांच्या प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. गावाचा सहभाग, श्रमदान इ. प्रबोधिनीच्या कामातील वैशिष्ट्येही लक्षात आली.

चहा घेऊन कात्रज घाट ओलांडून दुपारी १२.३०पर्यंत आम्ही प्रबोधिनीत परत आलो.सुमारे ५०० कि.मी.सायकल प्रवास पूर्ण झाला होता. विलक्षण आनंद होत

होता. आत्मविश्वास वाढला होता. १० दिवसांपूर्वीच आम्ही आणि आत्ताचे आम्ही यात खूपच बदल जाणवत होता. आम्ही खऱ्या अर्थाने वाढलो होतो. जिद्द, जिगर या शब्दांचे प्रत्यक्षातले अर्थ आम्ही अनुभवले होते. भरपूर कष्टानंतरच्या विश्रांतीतलं सुख आम्ही चाखलं होतं. उघड्या डोळ्यांनी खूप काही पाहिलं होतं. इथे जो वृत्तांत लिहिला तो समुद्रात दिसणाऱ्या हिमनगासारखा आहे. अजून अनुभवांचा खूप मोठा खजिना आमच्याकडे शिल्लक आहे. लिहायचे म्हटले तर मासिकाची ४८ पाने अपुरी पडतील. सगळे अनुभव कथन करायचे म्हटले तर आख्खा दिवस पुरायचा नाही.

स्वत: खूप दमलेले असतानाही मित्रांसाठी मदतीचा हात पुढे करण्याची सवय अंगी लागली आहे. महेन्द्रसरांबरोबर झालेल्या विविध विषयांवरच्या मनमोकळ्या गप्पा १० वी, १२वी नंतरचे निर्णय घेण्यास नक्कीच उपयोगी पडतील. या सहलीतली ही सर्व अनुभवांची शिदोरी आयुष्यभर लक्षात राहील.

एका बाजूला खोडद, आर्वी सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आधुनिक तीर्थक्षेत्रेही आम्ही पाहिली तर दुसऱ्या बाजूला देहू-लेण्याद्री-ओझर-रांजणगाव-भुलेश्वर येतील भक्तीस्थानेही पाहिली. राळेगण सिद्धी, नारायणगाव, सासवड येथील ध्येयवेड्या माणसांनी निर्माण केलेली वर्तमानातील नंदनवनेही पाहिली. पराक्रमी इतिहासाची साक्ष देणारे शिवनेरी, पुरंदर सारखे किल्लेही चढलो, राकट सह्याद्रीतल्या खाचखळग्याच्या अन् फुफाट्याच्या रस्त्यारूनही सायकल दौडवली, अन् गुळगुळीत अशा राष्ट्रीय हमरस्त्यावरूनही सायकल पळवली. रखरखीत उन्हातूनही प्रवास केला आणि अंधाऱ्या रात्रीचीही मौज लुटली. पुरणपोळी, बुंदी अन् शिऱ्याचे गोड जेवणही खाल्ले अन् हा हा करत झणझणीत पाव रस्साही रिचवला. हिरव्यागार परिसरात भरपूर पाण्यामध्ये मनमुराद डुंबलोही आणि भगभगीत दुष्काळी भागात तांब्याभर पाण्यातही सर्व आवरून आम्ही पुढे गेलो. शेतातला उभा गोड ऊसही मनसोक्त खाल्ला आणि झाडावरची आंबट कैरीही मिटक्या मारीत फस्त केली.१० दिवसातले असे विलक्षण टोकाचे अनुभव किती सांगू अन् किती नको?

उन्हाळी प्रदीर्घ सुट्टीतले १० दिवस सार्थकी लागले याचा अभिमान वाटतो. कष्टातही आनंद असतो हे आम्हाला हळूहळू समजायला लागले आहे. विविध गावांहून आलेले १० दिवसांपूर्वीचे अपरिचित आता खास दोस्त बनले आहेत. 'केल्याने देशाटन...'चा खरा अर्थ उलगडू लागला आहे. शिक्षण चालू असेपर्यंत आणि नंतरही होता होईतो महाराष्ट्रातला अधिकाधिक भाग सायकलने हिंडायचं आम्ही ठरविलं आहे.पुढच्या वेळी तुम्हीही सोबत याल नां!

युद्धनेतृत्व

कु. दिपाली गोगटे,सांगली

'इतिहासात नेहमीच असे दिसते की जेतेच इतिहास लिहितात म्हणून पराभुतांच्या नशिबी येतो तो तीव्र अपमान'!

हे एका युद्धेतिहासात कायम आढळणारे कटू सत्य.युद्धोत्तर काळातील अनेक विज्ञानांची पुस्तकेही याच पठडीतील आढळतात. ह्या पार्श्वभूमीवर 'युद्धनेतृत्व' या पुस्तकाची दुसऱ्या महायुद्धावर नि:पक्षपातीपणाने परखड सत्य मांडणारे दुर्मिळ पुस्तक अशी नोंद व्हावी.मन खिळवून ठेवणाऱ्या ह्या पुस्तकाचे लेखक आहेत युद्धाविषयीचे जाणकार सव्यासाची पत्रकार श्री.



वाचलेच पाहिचे असे काही

दि.दि.गोखले !

पुस्तकाची सुरुवात होते दुसऱ्या महायुद्धाच्या संक्षिप्त आढाव्याने. पाठ्यपुस्तकांमुळे दुसऱ्या महायुद्धाबद्दल थोडीफार माहिती असल्यामुळे किंवा युद्धाविषयीचे एकंदर मत प्रतिकूल असल्याने पुस्तक प्रारंभी कंटाळवाणे वाटण्याची शक्यता आहे.मात्र त्यानंतर चार नेत्यांच्या वर्णनापासून मात्र पुस्तक सोडूच नये अशी अवस्था होते.

पुस्तकाचा खरा प्रारंभ होतो 'चर्चिल' यांच्या चरित्राने.चर्चिल यांच्यासारखा मुत्सद्दी नेता केवळ युद्धनेतृत्वासाठीच जन्माला आला होता. कारण चर्चिल दहा वर्ष उशीरा जन्माला आले असते तर पहिल्या महायुद्धाच्या वेळी ते मंत्री बनू शकले नसते व अननुभवी राहिले असते आणि लवकर जन्मते तर दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ते ७५ वर्षाचे म्हणजे फारच वृद्ध झाले असते.'

लेखकाची ही मिमांसा पुस्तक वाचताना उलगडते.आपले म्हणणे येनकेन प्रकारे दुसऱ्याच्या गळी उतरवणे आणि हजरजबाबीपणा हे चर्चिलचे मुख्य गुण.

युद्धाचा बारीक-सारीक तपशील, युद्धतंत्रातील त्यांच्या एकेक अफलातून कल्पना आणि सोयीसाठी एकत्र आलेल्या स्टॅलिन व चर्चिल यांची जुगलबंदी वाचल्याखेरीज चर्चिल काय ताकदीचे नेते होते याची कल्पनाच येणे अशक्य.

असं म्हणतात की There are no shortcuts to success. यशासाठी हिटलर यांना तब्बल २५ वर्षे थांबावं लागलं. झगडावं लागलं. यश मग ते काही काळापुरतं का असेना त्याने जर्मन जनतेची अस्मिता जागवली. आजच्या जर्मनीच्या यशाची बीजे यातच आढळतील. हिटलर यांच्या आयुष्यातला उत्तुंग यश आणि घोर अपयश याचा आलेख पानोपानी जाणवतो. देशप्रेम, मित्रप्रेम, युद्धाचे अमाप ज्ञान आणि दुसरीकडे भयंकर ज्यूद्वेश, क्रौर्य याचा अभूत संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. आपल्या भारतीयांच्या संदर्भात सांगायचं तर, महायुद्धाच्या वेळी नेताजी सुभाषचंद्रांना जपानच्या मदतीविषयी शंका येताच, 'जपानने जर तुमच्याशी विश्वासघात केला तर जर्मनी जपानशी झालेला मैत्री करार तोडेल'असा त्यांना विश्वास देणारे वेगळेच हिटलर पुढे येतात. तसेच, 'डंकर्कची यशस्वी माघार', हा प्रसंग वाचल्यावर आजदेखील कोणाही ब्रिटीशाची मान अभिमानाने उंचावते. त्यामागचे 'खरे रहस्य' पुस्तक वाचतानाच उमगते. जगातील तीन महाशक्तिच्या नाकी दम आणणाऱ्या या वादळाची अखेर मात्र हृदयद्रावक झाली आहे.

याच बाबतीत एक अजब योगायोग आढळून येतो.हिटलर व रुझवेल्ट राज कारणातले हे कट्टर विरोधक जवळपास एकाच वेळी राष्ट्राध्यक्ष झाले आणि त्या दोघांचा मृत्यूही केवळ १८ दिवसांच्या फरकाने झाला. फरक इतकाच की एकाचा शारीरिक दौर्बल्याने तर दुसऱ्याचा मानसिक दौर्बल्याने अनैसर्गिक झाला. अमेरिकेचा युद्ध-प्रवेश आणि प्रचंड शस्त्रोत्पादन या दोन गोष्टी महायुद्धात दोस्तराष्ट्रांच्या विजयाला कारणीभूत ठरल्या, ज्यांचे जनक होते रुझवेल्ट! चर्चिल यांच्याबद्दल प्रेम पण त्यांच्या सम्राज्यवादीवृत्तीबद्दल अढी आणि स्टॅलिनबद्दल मात्र विश्वास असे अजब मिश्रण त्यांच्यात आढळते. ''अमेरिकेच्या शत्रूंना तिच्या सामर्थ्याचे विश्वरूपदर्शन आणि हितचिंतकांना चैतन्याचे लोभस दर्शन त्यांनी घडवले'' या विधानामागील यथार्थता पुस्तक वाचताना कळून येते.

रुझवेल्ट यांच्या स्वप्नाळू धोरणाचा स्टॅलिन यांनी पुरेपुर फायदा उठवला. युद्ध

हे केवळ रणांगणावरच्या विजयाने संपत नसतं,त्यात अनेक खाचाखोचा असतात. यालाच युद्धोत्तर राजकारण म्हणतात. यात अर्ध यश सामावलेलं असतं. या चार नेत्यांपैकी केवळ स्टॅलिनच पूर्णत: यशस्वी ठरले. अचूक निर्णय, शांत-संयमी वृत्ती यासारख्या स्टॅलिनच्या अनेक नेतृत्व गुणांचे दर्शन पुस्तकातून होत राहते. युद्धपूर्व आणि युद्धोत्तर स्टॅलिन यांची कारकीर्द कशीही असली तरी युद्धकाळातील त्यांचे नेतृत्व हे वादातीत होते याची प्रचीती ह्या पुस्तकामुळे येते.

शेवटी नेतृत्व ही अशी गोष्ट आहे की जी थोड्या प्रमाणात उपजत तर थोड्या अधिक प्रमाणात घडवावी लागते. नेतृत्व व त्यातही युद्धकालीन नेतृत्व ही तर फारच जोखमीची बाब आहे.युद्धकाळात घेतलेले अनेक निर्णय हे इतिहास घडवणारे असतात.कोणत्याही परिस्थितीत युद्धनेता त्याला जबाबदार ठरणार असतो. त्याच्या एका निर्णयासरशी देशाचे भवितव्य धोक्यात येऊ शकते. हाच खूप मोलाचा क्षण असतो. अमेरिका तटस्थ, रशियाचा अनाक्रमण करार आणि फ्रान्सची शरणागती अशा प्रतिकूल परिस्थितीतही चर्चिल यांच्या शेवटपर्यंत युद्ध करण्याच्या निर्णयाने इतिहास घडवला. इथेच नेतृत्वाची कसोटी लागते. या पैलूंची ओळखही पुस्तकामुळे होते.

असे हे भिन्न मातीतले, भिन्न स्वभावाचे चौघे नेते. चर्चिल लोकशाहीच्या चौकटीतूनही यशस्वी का ठरले? हुकूमशहा हिटलरवर जर्मन जनतेने युद्धपूर्व व युद्धोत्तरही अपरंपार प्रेम का केले? भावी शांतता व मानवी मूल्य या मृगजळात हरवल्यामुळे रशियन साम्राज्यवादाला आपणहून वाट मोकळी करून देऊनही रुझवेल्ट विजयाचे शिल्पकार का ठरले? आणि रशियातील भयंकर दहशत पर्वानंतरही क्रूर स्टॅलिन रशियन जनतेचा लाडका का ठरला? दुसऱ्या महायुद्धातील ह्या अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांची नि:पक्षपाती उत्तरेही याच पुस्तकात आढळतील.

या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'युद्ध हा केवळ सैन्यातल्या लोकांचा प्रांत नव्हे' हे सत्य कळते. बहुतांश माणसे 'आपल्याला ह्या विषयात काय कळते?' या प्रवृत्तीची असतात, हा देखील गैरसमज या पुस्तकामुळे निश्चित दूर होईल. युद्ध हे रानटी क्रूर कृत्य नसून एक तंत्र आहे, ती कला आहे व नकोसे वाटले तरी सध्याच्या काळाची गरज आहे, हे पक्केपणाने पटते. पुस्तकाची भाषाही अतिशय सोपी आहे.म्हणूनच प्रत्येकाने विशेषत: नेतृत्व गुणांची आवड असणाऱ्यांनी हे पुस्तक अवश्य वाचावेच.

युद्धनेतृत्व
ले.दि.वि.गोखले
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे ३२३ किंमत रु.६०/-

तुम्हाला माहित आहे का ?

आदित्य कर्णिक

१) दक्षिण गंगोत्री कुठे आहे ?

भारतीयांचा मानबिन्दु असलेल्या गंगा नदीच्या हिमालयातल्या उगमस्थानाला 'गंगोत्री' म्हणतात. या पवित्र नावावरून 'अंटार्क्टिका' या दक्षिणतम, बर्फाच्छादित खंडावर असलेल्या भारतीय बेसला 'दक्षिण गंगोत्री' हे नाव दिले गेले आहे. वर्षभर शून्याच्या खाली कित्येक सेल्सियस तापमान असणारा, मैलन् मैल बर्फाचीच जमीन असणारा आणि जिथे अक्षरश: गवताचं एक पातसुद्धा उगवत नाही असा हा खंड आपल्यासाठी एक गूढच राहिला आहे. त्यामुळे यावर संशोधन करण्यासाठी जे काही मोजकेच देश मोहिमा यशस्वी करून अंटार्क्टिकावर पोचले त्यात भारताचा समावेश आहे ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

२) न्यूमिसमॅटिक्स म्हणजे काय ?

विविध प्रकारची नाणी व मेडल्स यांच्या अभ्यासशास्त्राला न्यूमिसमॅटिक्स म्हणतात. या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्याला 'न्यूमिसमॅटिस्ट' असे म्हणतात. या शास्त्रात वेगवेगळी नाणी,राजमुद्रा जमवून, कालस्थान यानुसार त्यांची विभागणी करून शास्त्रशुद्ध अभ्यास केला जातो. यावरून भूतकालाची संस्कृती, मनोवृत्ती यांच्या वैशिष्ट्यांची ओळख पटण्यास मदत होते. नुसती नाणी जमवणे (विविध देशांची, काळांची) हा एक छंद म्हणूनही जोपसला जातो.

३) टोपण नावे –

गोविन्दाग्रज,बाळकराम–राम गणेश गडकरी
केशवसुत – कृ. के. दामले
कुसुमाग्रज – वि.वा.शिरवाडकर
केशवकुमार – प्र.के.अत्रे
अनिल – आत्माराम देशपांडे
गिरीश – शं.के.कानिटकर
यशवन्त – य.दि.पेंढरकर
ग्रेस – माणिक गोडघाटे

४) अवकाशातून दिसणारी मानवनिर्मित वस्तू – आपल्या बुद्धीच्या जोरावर विविध शास्त्र विकसित करून पिरॅमिडस्, किल्ले यापासून नव्या उंच इमारती, पूल, स्टेडियम्स्, प्रचंड कारखाने, धरणं मनुष्याने बांधली. आपल्याला भव्य वाटणाऱ्या या वस्तू निसर्गाच्या भव्यतेपुढे नेहमीच छोट्या वाटतात.त्यामुळे अवकाशातून पृथ्वीवर नजर टाकली असता कोणतीही मानवनिर्मित वस्तू दिसत नाही, अपवाद चीनची भिंत शि हुआंगडी या राजाने ख्रिस्तपूर्व साधारण २५० व्या वर्षी ही भिंत बांधावयास घेतली. १५०० मैल लांब, २०-२५ फूट उंच, १५-२० फूट रुंद भिंत परकीय आक्रमणे थोपवण्यास बांधली गेली.जिंआयुग्वान ते शानहाईग्वानपर्यंत असणारी ही भिंत जवळपास ३,००,०००कामगारांनी बांधली.

भरारी नववी –कल्पनांचा ओघ

डॉ. अशोक निरफराके

आपला सगळा विचार आपल्या स्मरणावर अवलंबून असतो हे आपण पाहिले. म्हणून स्मरणाचा वेग वाढविण्याची तंत्रेही आपण पाहिली. स्मृती भांडारात साठविलेल्या माहितीची आवश्यक तर हलवाहलव करून (स्थानांतरित स्मरण करून) त्या माहितीवर, माहितीच्या तुकड्यांवर बदल करणे, एकमेकांत मिसळणे, विशिष्ट क्रमाने मांडणी करणे अशी प्रक्रिया मनातल्या मनात सुरू झाली की माहितीचे नवे तुकडे जन्माला येतात.यालाच आपण कल्पना सुचणे असे म्हणतो.

अशा कल्पना सुचण्याचा वेग सुद्धा आपण मोजू शकतो आणि नंतर तो वाढवू सुद्धा शकतो.बोलण्याचा किंवा वाचण्या-चा वेग जसा एका मिनिटात 'अमुक इतके शब्द' असा मोजतात, त्याप्रमाणे कल्पना सुचण्याचा वेग 'अमुक मिनिटात अमुक कल्पना' असा मोजतात. त्यासाठी आपण एखादे असे उदाहरण घेऊ की ज्यात तुम्हाला कल्पनाशक्ती वापरावी लागेल.

तुम्ही कागद पेन घेऊन बसा. समोर घड्याळ असू द्या. दिलेल्या विषयावर ५ मिनिटात सुचतील तितक्या कल्पना लिहून काढा.प्रत्येक कल्पना स्वतंत्र ओळीवर, थोडक्यात,काही शब्दात लिहा.लिहिताना हस्ताक्षर किंवा शुद्धलेखन यांच्याकडे

कल्पक बनूया

दुर्लक्ष झाले तरी चालेल. उदा.तुमच्या गावात वर्षभर नियमितपणे रोज संध्याकाळी पाच ते सहा या वेळात पाऊस पडू लागला, तर काय काय घडेल? परिणाम काय काय होतील?

लिहायला सुरुवात करा आणि ५ मिनिटे पूर्ण होताच थांबा. आता लिहून झालेल्या एकूण कल्पनांची संख्या मोजा. पाच मिनिटात तेवढ्या कल्पना हा तुमचा कल्पना सुचण्याचा वेग झाला. त्यालाच कल्पनेचा ओघ असेही म्हणतात. हा ओघ वाढविण्यासाठी काय करायचे? या पूर्वीच्या एका लेखात सुचविल्याप्रमाणे कल्पना सूचत असताना त्यांचे मूल्यमापन करायचे नाही हे सूत्र तुम्ही पाळले होते ना?आता दुसरे सूत्र पाहू.ते सूत्र आहे-किती

कल्पना सुचायला हव्यात याचे संख्यात्मक उद्दिष्ट ठरवा. 'पहिल्या पाच मिनिटात तुम्हाला जेवढ्या कल्पना सुचल्या त्याच्या दुप्पट तरी हे उद्दिष्ट हवे.

सहजासहजी गाठता येणार नाही असे उद्दिष्ट समोर ठेवल्याचे काही फायदे असतात. एकतर उद्दिष्टामुळे चेव चढतो आपण जास्त झपाटून विचार करू लागतो. आणि दुसरे म्हणजे जास्त चांगल्या कल्पना सुचतात. ते कशामुळे? तर मनाच्या पृष्ठ-भागावर तरंगणाऱ्या कल्पना सहज लिहून होतात. या कल्पना बहुधा आपण कुठे तरी ऐकलेल्या किंवा वाचलेल्या, म्हणजे शिळ्या च असतात. त्या सगळ्या लिहून झाल्या तरी उद्दिष्ट पूर्ण झालेलेच नसते. (अर्थात मुळात उद्दिष्ट तेवढे मोठे ठेवायला हवे.) ते पूर्ण व्हावे म्हणून आपण स्मृतिसागरात जास्त खोल बुड्या मारू लागतो. वरवर बुड्या मारल्यावर शंख, शिंपले हाती लागले होते. पण आता खोल बुडी मारल्यावर मोती हाताला लागण्याची शक्यता वाढते. म्हणजे आपण आपल्या विषयाशी दुरून संबंधित आहेत असे वाटणारे माहितीचे तुकडे सुद्धा एकमेकांत मिसळून कल्पना रचू लागतो. त्या जास्त ताज्या आणि नव्या असण्याची शक्यता असते. विषयाचे उदाहरण घेऊन बोलायचे तर रोज पाऊस म्हणजे खूप पाऊस, जास्त पाणी, जास्त चिखल, छत्र्या, रेनकोट, कपडे लवकर न वाळणे वगैरे कल्पना लगेच सुचतात कारण त्या पावसाळ्याशी संबंधित आहेत. त्या सगळ्या लिहून झाल्यानंतर, आपले नवे उद्दिष्ट समजा पाच मिनिटात दहा कल्पना असे असले, तर आपण पाणी ओलेपणा वगैरे ओलांडून जास्त दुसऱ्या परिणामां बद्दल कल्पना करू लागू, उदा. पाऊस पडण्याची वेळ आधीच नक्की माहीत असल्या मुळे दिवसभराचे कार्यक्रम ठरविण्याच्या बाबतीत कितीतरी परिणाम लिहिता येतील. शाळा, महा-विद्यालये, कचेऱ्या, करमणूकीचे कार्यक्रम, सार्वजनिक समारंभ यांच्या वेळां बाबत लिहिता येईल. तसेच भूगोलामध्ये बारमाही पावसांच्या प्रदेशाबद्दल वाचलेले असले तर हवामान, वनस्पती, पिके, घरांची रचना इ.मध्ये होणाऱ्या बदलांविषयी लिहिता येईल. नव-नवीन कल्पनांचा असा ओघ सुरू झाला तो आपणच आपल्यावर मोठ्या उद्दिष्टांची सक्ती केल्यामुळे.

भरपूर संख्येने कल्पना सुचणे हे कल्पक-तेच्या सर्वच क्षेत्रांमध्ये आवश्यक असते. तुम्हाला अगदी आश्चर्य वाटेल अशा क्षेत्रातले उदाहरण सांगतो.ते आहे संगीत दिग्दर्शनामधले, 'पिंजरा' या चित्रपटातील 'दे रे कान्हा' या गीताच्या विविध बेचाळीस चाली मी शांताराम बापूंना ऐकविल्या होत्या.'' असे श्री.राम कदम यांनी एका मुलाखतीत सांगितले होते! ('गाण्यातील गुरुंची परंपरा गेलीय..' सुधीर गाडगीळ, सकाळ, दि.२७ ऑगस्ट १९८८.)

तेव्हा 'रोज पाऊस' या आपल्या विषयावर तुम्हाला पंधरा मिनिटात सुचतील तितक्या कल्पना लिहून काढा.

वेगात! ओघात!

विनोद विशेषांक : स्पर्धा

या वर्षातला एक अंक हा विनोद विशेषांक म्हणून आपण काढणार आहोत. त्यासाठी खालील स्पर्धांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे. लेखन/चित्रे स्वत:ची असावीत व हे साहित्य २० जूलैपर्यंत आमच्याकडे पोहोचावे.

स्पर्धेचे विषय

१. ५० ते १०० शब्दांपर्यंतचा विनोद
२. २५० ते ३०० शब्दांपर्यंतची छोटी विनोदी कथा प्रसंग
३. व्यंगचित्रे (काळ्या-पांढऱ्या रंगातील)
४. विनोदी चित्रकथा (४ ते ६ चित्रांची)
५. निबंध (५०० शब्दांचा) विषय-'विनोद' हवेतच कशाला?

पहिल्या तीन क्रमाकांना बक्षिसे व अंकात प्रसिद्धी.

मासिकाच्या वर्गणी संबंधी

ज्यांनी १९९४ च्या दीपावली विशेषांकापूर्वी वर्गणी भरली आहे त्यासर्वांची मासिकाची वर्गणी जून अखेर संपत आहे.त्यासर्वांनी नवीन वर्षाची वर्गणी रु. ७५/- १५ जुलैपर्यंत स्थानिक कार्यालयात अथवा मुख्य कार्यालयात समक्ष अथवा पोस्टाद्वारा भरावी म्हणजे खंड न पडता पुढील वर्षाची मासिके नियमितपणे पाठविता येतील.

खास बक्षीस योजना !

जे सभासद १५ जुलै पर्यंत आपली वर्गणी भरतील त्या सर्वांना **'निबंध लेखनात सुधारणा कशा कराव्यात'** या संबंधीची पुस्तिका भेट मिळेल.

५ किंवा त्यापेक्षा अधिक नवीन सभासद मिळविणाऱ्यांना **'वाचलेच पाहिजे असे काही'** (किंमत रु. १५/-) हे पुस्तक भेट मिळेल.नवीन सभासदांकडून पुढील माहिती भरून घ्यावी. नाव, पत्ता, शाळा, इयत्ता, तुकडी, जन्मतारीख, विशेष छंद-यश व कुटुंबातील व्यक्तींची माहिती.माहितीचे कागद व वर्गणी एकत्र स्थानिक कार्यालयात समक्ष अथवा पोस्टाद्वारा पाठवावी. डिमांड ड्राफ्ट 'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने काढावा.त्या सर्वांची पावती व बक्षीस पाठविले जाईल.

धडपडणारे प्रबोधक

बारामती येथील नीलेश महाजन या दहावीतील सभासदाने त्याच्या मित्रांसह एक वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शन १६ ते १८ एप्रिल या काळात बारामतीमध्ये भरवले. सात खोल्यांमध्ये मिळून भरवलेले हे प्रदर्शन वैज्ञानिक उपकरणे, सामाजिक आर्थिक-राजकीय समस्यांचे व घटनांचे चित्रण, तक्ते, अनेक मान्यवरांच्या मुलाखतींचा संग्रह, विविध दुर्मिळ वस्तूंचा संग्रह असे विविध अंगांनी नटवले होते. अनेक प्रेक्षकांनी हे प्रदर्शन पाहून ह्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या प्रदर्शनाची रचना व योजना संपूर्णत: नीलेशचीच होती. त्यासाठी काम करण्याकरता गटही त्यानेच जमवला. तसेच पणदरे (बारामती जवळ असलेल्या गावात) येथे आल्हाद महाजनी व शर्मिला जगताप या दोघांनी मिळून २० विद्यार्थ्यांसाठी ४ दिवसांचे एक शिबिर घेतले. विज्ञान, योगासने, ध्यान, कथाकथन असे विविध उपक्रम त्यात त्यांनी घेतले. तुमची अशा प्रकारची धडपड आमच्यापर्यंत जरूर पाहोचवा.

'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

निगडी : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४. ☎ ८४३८०

सोलापूर : ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, डफरीन चौक, सोलापूर. ☎ २५७८२

सातारा : सौ. सुषमा हाडप, साकेत, एल.आय.सी. कॉलनी, शाहपुरी बसस्टँड जवळ, सातारा. ☎ ५००००२

सांगली : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२, गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली.

कोल्हापूर : डॉ. शुभांगी कुलकर्णी (सोलापूरकर), आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. ☎ २१५३४

नाशिक : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम,श्रीरामवाडी,म.गांधी रोड,नाशिक ☎ ५७४८३०

ठाणे : डॉ. अजित दातार, बी-२०, अहिल्या सोसा.,घंटाळी रोड, घंटाळी मंदिराजवळ, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७.

पनवेल : सौ. मेधा मयुरेश सोहोनी, पी एल-६-१३-६ सेक्टर १७ सिडको कॉलनी, अभ्युदय बँकेमागे, नवीन पनवेल.

रत्नागिरी : कु.नीता अ.श्रीखंडे, २९२३, जोशीवाडा, नवी मंडई रस्ता, रत्नागिरी. ☎ २२४८७.

धुळे : सौ.उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूड बाग, धुळे ☎ २३४८७.

चाळीसगाव : श्री. विंचूरकर, मुख्याध्यापक गुरूकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव.

लातूर : सौ. रजनी वैद्य, 'रुपाली',आंबेजोगाई रोड,एस.टी.वर्कशॉपसमोर,लातूर. ☎ ४२५२८.

परभणी : श्री. दिलीप राके. 'पारस' नाथनगर, परभणी किंवा बाल विद्यामंदिर, परभणी.

या कार्यालयांमध्ये मासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल.ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधन द्वारा प्रकाशित विविध पुस्तके या कार्यालयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत.छात्र प्रबोधन साठी आपले लेखनसाहित्य या केंद्रावर आपण हस्ते देऊ शकाल.तेथून ते पुण्याला पाठविले जाईल.छात्र प्रबोधनद्वारा आयोजित विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती व नावनोंदणी येथे करता येईल.

हे मासिक 'ज्ञान प्रबोधिनी'या संस्थेच्या मालकीचे असून सौर ज्येष्ठ ३० शके १९१७ (२० जून १९९५) या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.

ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधनची संग्राह्य पुस्तके

१. वाचलेच पाहिजे असे काही — प्रा. शैलजा देशमुख — १५ रु.

(वाचनीय २० पुस्तकांचा परिचय व १०० पुस्तकांची यादी)

२. बेध यशाचा — प्रा. महेन्द्र सेठिया, प्रा. विवेक पोंक्षे

(अभ्यासाची विविध तंत्रे समजावून सांगणारे पुस्तक, दुसरी आवृत्ती)

३. व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत — २५ रु.

(सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासंबंधी सोदाहरण, समग्र मांडणी कलले पुस्तक)

४. नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत? — प्रा. अंजली तळेगावकर — ४० रु.

(प्रकल्पासंबंधी अनुभवातून लिहिलेले उपयुक्त पुस्तक)

५. प्रबोधन गीते — १० रु.

५० रु.

(ज्ञान प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांनी रचलेल्या स्फूर्तिगीतांचा संग्रह)

६. बुद्धिवैभव — २० रु.

(बुद्धीचे १२० पैलू उलगडून सांगणारे पुस्तक)

७. छंद आकाशदर्शनाचा — डॉ. प्रकाश तुपे — १० रु.

(आकाशातील नक्षत्रे व ताऱ्यांचा परिचय करून देणारे पुस्तक)

८. राष्ट्रद्रष्टे विवेकानंद — डॉ. वि.वि. पेंडसे — ७५ रु.

(स्वामी विवेकानंदांचे प्रेरणादायी चरित्र)

९. विवेकानंदांचा राष्ट्रधर्म — डॉ. वि.वि. पेंडसे — ३० रु.

(स्वामी विवेकानंदांच्या वाङ्मयातील निवडक उताऱ्यांचा संग्रह व भाष्य)

१०. एक अदम्य उत्कट चैतन्य — डॉ. स्वर्णलता भिशीकर — ५० रु.

(ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक संचालक आप्पा पेंडसे यांचे प्रेरणादायी चरित्र)

आगामी प्रकाशने

१. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास — डॉ.अशोक निरफराके — ३० रु.

(ललित लेखन करण्यास शिकण्याचा मूलमंत्र देणारे पुस्तक)

२. कल्पक बनू या — डॉ.अशोक निरफराके — ३० रु.

(कल्पकशक्ती कशी वाढवायची याची गुरुकिल्ली सांगणारे पुस्तक)

३. गिर्यारोहण गाथा — श्री. आनंद पाळंदे — २५ रु.

(गिर्यारोहणाची प्रेरणा निर्माण करणारे व माहिती देणारे पुस्तक)

४. असे घटते सुंदर अक्षर — प्रा. अशोक ताकमोगे — १० रु.

(हस्ताक्षर सुधारण्यासाठी अनुभवातून तयार झालेली पुस्तिका, दुसरी आवृत्ती)

ही सर्व पुस्तके छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयात तसेच स्थानिक कार्यालयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. सभासदांना मूळ किंमतीवर १० % सवलत मिळेल.

शैक्षणिक संस्था, शाळा व ग्रंथालयांना १०० रु. अथवा त्यापेक्षा अधिक खरेदीवर १५ % सवलत !

टपाल नोंदणी क्र.छात्र प्रबोधन - PNCW/ 349 तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

क्षितिज नवे मज....



क्षितिज नवे मज सतत बोलवी, साथीला सन्मित्र हवे
आज एकटा, अनघड जरि मी, मनात अंकुर हा उगवे
क्षितिज नवे रे, क्षितिज नवे ! ॥ध्रु॥
निद्रेमधुनी जागा होता नवाच मी मजला दिसतो
उलगडणारी दुनिया भवती मी मध्ये माझा नसतो
साखरझोपेमधली हसरी स्वप्नमालिका अवतरते
कठोर अवघड सारे सरुनी आसमंत होती हिरवे
क्षितिज नवे रे, क्षितिज नवे!
चुटकीसरशी सुटती गणिते गूढ समस्या आकळती
शतकांमधल्या उग्र लढाया जिंकुनिया मी छत्रपती
ग्रहगोलांची भ्रमणे अगतिक आणिक नियती सर्व कळे
अज्ञानाचा तिमिर सरे अन् ज्ञानाचा सविता उगवे
क्षितिज नवे रे, क्षितिज नवे!
हिरमुसलेले नुरले कोणी आणि पांगले जे रडवे
मलाच माझे रूप उमजता मित्र मिळाले सर्व नवे
मी न एकटा माझ्या सोबत विहंगमांचे भव्य थवे
सर्वांसाठी एकच गाणे प्रबोधनाचे हे उजवे
क्षितिज नवे रे, क्षितिज नवे!

शिबिरांमुळे हा अंक आपल्यापर्यंत पोहोचविण्यास उशीर होत आहे त्याबद्दल दिलगीर आहोत.

संपर्क पत्ता
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरभाष : ४७७६९१

कार्यालयाची वेळ : स. १० ते संध्या ७
या अंकाची किंमत : रुपये ६/-
वार्षिक वर्गणी : रुपये ७५/- फक्त.
प्रकाशन दिनांक : सौर ३० ज्येष्ठ, शके १९१७
२० जून, १९९५